**नेमणे आहे**

नामवंत दै. 'जनता आवाज' वृत्तपत्रासाठी प्रतिनिधी नेमणे आहेत.

१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड

संपर्क:- ८८९६७११७११

jantaawajnews@gmail.com

# दैनिक जनता आवाज



**साई समर्थ सिमेंट प्रॉडक्टस्**

पाईप कंपनी — ६ इंच ते ६ फुटापर्यंत सिमेंट पाईप (As Per ISI) योग्य दरात उपलब्ध.



सिमेंट पाईप | सेफ्टिक टँक | वॉटर टँक | गव्हाणी,ढापे | सिमेंट पोल

सतिष उत्तमराव खर्डे पा. 9552749534 | अमोल सितराम थोरात पा. 9764626533 | ज्ञानेश्वर रघुनाथ खर्डे पा. मा.उपसरपंच,को.बु॥

राहुरी रोड,श्री स्वामी समर्थ केंद्राच्या पुढे,कोल्हार बु॥ 9765481334



अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक १३३ मंगळवार, दि. ०८ जुलै २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये


# नव्या पिढीने प्रागतिक विचार जपावा

## माजी केंद्रीयमंत्री शरद पवार यांचे आवाहन; कोकणी माणूस मुळातच व्यवहारी

जनता आवाज वृत्तसेवा

**मुंबई : महाराष्ट्राचे समाजकारण योग्य मार्गावर आणण्यासाठी प्रागतिक विचारांच्या लोकांना एकत्र येण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केले आहे. अलिबाग येथे शेतकरी कामगार पक्षाचे नेते जयंत पाटील यांचा काल ७० वा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी पीएनपी नाट्यगृहाच्या उद्घाटन सोहळ्याला मार्गदर्शन करताना शरद पवार यांनी उपरोक्त आवाहन केले.**



शरद पवार म्हणाले, इथली संस्कृती इथला परिसर वैशिष्ट्यपूर्ण आहे. आपल्याला बुद्ध लेणी आणि शिलालेख याचं दर्शन आपल्याला या भागामध्ये होतं. अनेक ऐतिहासिक गोष्टी या भागात घडल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी रायगडावर राज्य स्थापन केलं तो हाच परिसर. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चवदार तळ्याचा सत्याग्रह केला तोही हाच परिसर. शेजारच्या खंदेरी बेटावर मायनाक भंडारी यांनी नौदलाच्या तळावर इंग्रजांचा पराभव केला तोही हाच परिसर. आज या ठिकाणी कान्होजी आंग्रे यांचे वंशज आहेत.

नाट्यगृह आणि कला या क्षेत्रांशी सुसंवाद या भागाचा फार जुना आहे आणि ते जर सांगायचं झालं तर एकेकाळी रायगड जिल्हा हा शक्तीतुऱ्यांचे सामने गाजवणारा म्हणजे ज्याला बाल्या डान्स म्हणतो. त्याबद्दलचं वैशिष्ट्य या भागाचं होतं. या भागाने अनेक कलावंत दिले, शाहीर दिले, मराठी रंगभूमीला गायक दिले, कलाकार दिले आणि या नाट्यगृहाला शोभेल अशा प्रकारचे कर्तृत्व दाखवणारे अनेक कलाकार या भागातून गेले आणि त्यांच्यासाठी थिएटरची आवश्यकता होती पण लोकांना शंका होती की पुन्हा नाट्यगृह सुरू होणार की नाही? पण आता आनंदाची गोष्ट ही आहे की थिएटर आता पुन्हा उभं राहिलं आहे.

जयंतरावांनी जे कष्ट यासाठी घेतले जे आव्हान स्वीकारलं. त्या कष्टातून पुन्हा एकदा पूर्वीपेक्षा अधिक उत्तम साऊंड सिस्टिम असलेलं, आसन व्यवस्था असलेलं हे थिएटर काल या ठिकाणी पुन्हा उभं राहतंय. याचा मला मनापासून आनंद आहे.

रायगड जिल्हा हा महाराष्ट्रातील एक आगळा वेगळा असा जिल्हा आहे. आज या ठिकाणी येताना आम्हाला लक्षात आलं. राजकारणात काही गोष्टी घडतात पण त्या तशा घडतात म्हणून नाउमेद व्हायचं नसतं. अलिबागला आल्यापासून मी सकाळपासून बघतोय रस्त्याने सुद्धा ठिकठिकाणी लोकांनी थांबवलं आणि तिथे बघितलं की लोकां मध्ये एक जिद्द आहे. पुन्हा एकदा आम्ही शेतकरी कामगार पक्ष इथे उभा करू, मजबूत करू. ही भावना ठिकठिकाणी दिसते. आज या पक्षाला प्रोत्साहित करण्याची भूमिका जयंतराव अतिशय चिकाटीने करत आहेत. कधी कधी मला आठवतं कि जरी माझं आयुष्य काँग्रेसमध्ये गेलं तरी माझं सगळं घर शेकापवालं.

माझ्या घरात माझी आई शेकापची, माझे भाऊ वसंतराव पवार हे शेकापचे जे लोकसभेचे उमेदवार होते, सगळं कुटुंब हे शेकापचं. मी एकटा काँग्रेसवाला. पण आमच्या आईचं म्हणणं होतं तुझी विचारधारा तू तुझ्या पद्धतीने चालव आम्ही सगळे जी विचारधारा मानतोय ते आम्ही आमच्या रस्त्याने जाणार. शेतकरी कामगार पक्ष मी लहानपणापासून माझ्या घरात पाहिलेला आहे. माझ्या घरामध्ये भाऊसाहेब राऊत येत, कधी केशवराव जेधे आलेले आहेत, कधी शंकरराव मोरे आलेले आहेत, कधी नाना पान ४

> मला या कार्यक्रमाला इथं येता आलं गेल्या अनेक वर्षांचा या कुटुंबाशी आमचा ऋणानुबंध आहे आणि तो ऋणानुबंध आम्ही कायम ठेवू. महाराष्ट्राच्या भल्यासाठी एकत्र राहू आणि त्यासाठी जे जे करावे लागेल ते करण्यासाठी सहकार्य करू एवढाच विश्वास या ठिकाणी व्यक्त करतो.
>
> **– शरद पवार**

# विधानसभेत कर्जत-जामखेडचा आवाज घुमला

## आ. पवारांनी वीज, आयटी पार्क, रस्ता याकडे वेधले सरकारचे लक्ष

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : कर्जत-जामखेड मतदारसंघातील विविध महत्त्वाच्या प्रश्नांवर आ. रोहित पवार यांनी काल विधिमंडळात पुरवणी मागण्यांवर बोलताना ठाम भूमिका घेत सरकारचे लक्ष वेधले.

आ. पवार म्हणाले की, कर्जत व जाम खेड शहरांच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही प्रकल्प, सीआरपीएफ सेंटरच्या दुसऱ्या टप्प्यासाठी निधी, तसेच खर्डा व मिरजगाव पोलीस ठाण्यांच्या नव्या इमारतीसाठी अर्थसाहाय्य देण्याची स्पष्ट मागणी केली.

तसेच ज्ञानराधा मल्टीस्टेट सहकारी संस्थेमध्ये अडकलेल्या नागरिकांच्या ठेवी तात्काळ परत मिळाव्यात, अशी मागणी करत मतदारसंघातील ठेवीदारांचे हित जपण्याची भूमिका त्यांनी मांडली. पोलिस दलातील प्रश्नांवरही त्यांनी स्पष्टपणे सरकारला जाब विचारला. पोलिसांसाठी गृहकर्ज योजना, पदोन्नती, बदली प्रक्रिया आणि पोलीस भरतीच्या अडचणी लवकरात लवकर सोडवाव्यात, अशी मागणी त्यांनी केली.



कर्जत-जामखेडमधील युवकांसाठी रोजगार निर्मितीचा मोठा पर्याय ठरू शकणारा एमआयडीसी प्रकल्प राजकारणात अडकला असून, तो मार्गी लावण्यासाठी सरकारने तातडीने पावले उचलावीत, असेही त्यांनी ठणकावून सांगितले.

राज्यस्तरीय मुद्द्यांवर भाष्य करताना पवार यांनी उद्योगांना मिळणारी महागडी वीज, तसेच हिंजवडी आयटी पार्कमधील खराब रस्त्यांची दयनीय अवस्था यांकडेही सरकारचे लक्ष वेधले. सौर ऊर्जा प्रकल्पांसाठी नागरिकांकडून पैसे घेतले जात असतानाही सोलर कनेक्शन वेळेवर दिले जात नाही, आणि दुसरीकडे वीज कनेक्शनही नाकारले जाते, यावर त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त पान ४

# कोपरगाव बाजारपेठेची आर्थिक उलाढाल वाढविण्यात यश

## आ. आशुतोष काळे; ३.३६ कोटींच्या भव्य व्यापारी संकुलाचे भूमिपूजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी** : कोपरगाव शहराच्या विकासाच्या समस्या सोडविण्यात यशस्वी होवून कित्येक दशकापासून प्रलंबित असलेल्या पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नाबरोबरच रस्त्यांचे प्रश्न देखील सुटले आहेत. कोविडच्या काळापासून ऑनलाईन संस्कृती तर वाढली आहेच. परंतु त्याचबरोबर मागील काही



वर्षापासून मॉल संस्कृती देखील मोठ्या प्रमाणात वाढत चालली असतांना देखील कोपरगाव शहरात झालेल्या विकासामुळे कोपरगावच्या बाजारपेठेची आर्थिक उलाढाल वाढविण्यात यश आले असल्याचे प्रतिपादन आ. आशुतोष काळे यांनी केले.

कोपरगाव नगरपरिषद इमारतीसमोर ३.३६ कोटी रुपये निधीतून उभारण्यात येणाऱ्या भव्य व्यापारी संकुलाचे भूमि पूजन नुकतेच आ. काळे यांच्या हस्ते संपन्न झाले याप्रसंगी ते बोलत होते.

आ. काळे म्हणाले की, कोपरगाव मतदारसंघातील प्रत्येक गावाप्रमाणे कोपरगाव शहराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी पाचशे कोटीचा निधी दिला आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी कोपरगाव शहराचा पाणी प्रश्न सोडविण्याचा दिलेला शब्द पूर्ण करून पाच नंबर साठवण तलावाचे कोपरगावकरांच्या खिशाला झळ बसू न देता काम पूर्ण केले. त्यामुळे कोपरगाव शहराला तीन दिवसा आड पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे मागील कित्येक दशकांपासून पाण्यासाठी कोपरगावकरांची विशेषता माता– पान ४

> राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सहकार्यातून बस स्थानक परिसरात व्यापारी संकुल उभारण्यासाठी १४ कोटी रुपये निधी आणला आहे. या व्यापारी संकुलाचे जवळपास ७० टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित कामही लवकरच पूर्ण होईल. कोपरगाव शहरात ज्या-ज्या ठिकाणी कोपरगाव नगरपरिषदेच्या मालकीच्या जागा व्यवसायासाठी अनुकूल आहेत त्या-त्या ठिकाणी व्यापारी संकुल उभारणार आहे.
>
> **– आशुतोष काळे, आमदार**

# केंद्रीय मानक कार्यपध्दतीचे पालन करा

## मानव-बिबट्या संघर्षावर उपाययोजना करण्याचे मंत्री भूपेंद्र यादव यांचे निर्देश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : नगर जिल्ह्यासह राज्यभर वाढत्या बिबट्यांच्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर नागरीकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या गंभीर विषयाची वेळोवेळी संसदेत तसेच केंद्र शासनाकडे ठामपणे मांडणी करणारे खा. नीलेश लंके यांना मोठे यश मिळाले असून केंद्रीय पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव यांनी महाराष्ट्र शासनाच्या वन विभागाला स्पष्ट व तातडीचे व अंमलबाजावणी योग्य निर्देश दिले आहेत.

यासंदर्भात पाठपुरावा करताना खा. लंके यांनी मंत्री भूपेंद्र यादव यांना निवेदन सादर केले होते. त्यात नमूद करण्यात आले होते की, नगर जिल्ह्यातच नव्हे तर राज्यातील अनेक गावांमध्ये बिबट्यांच्या हल्ल्यांमुळे नागरिकांचा मृत्यू झाला आहे. अनेक शेतकरी, महिला, लहान मुले या हल्ल्यांना



बळी पडले असून ग्रामीण भागात भीतीचे सावट पसरले आहे. या पार्श्वभूमिवर संवेदनशील भागांत त्वरित संरक्षण यंत्रणा उभारणे, पथके तैनात करणे आणि पीडीत कुटूंबांना तात्काळ मदत मिळावी अशी खा. लंके यांची ठाम मागणी होती. केंद्र सरकारने यासंदर्भात महाराष्ट्र राज्याच्या वन विभागाच्या प्रधान सचिवांना पत्र पाठवून विविध प्रकारचे निर्देश दिले आहेत.

संवेदशील भागांची ओळख पटवावी. बिबट्याच्या सतत वावरामुळे उच्च धोका निर्माण झालेल्या गावांची यादी तातडीने तयार करावी. त्वरित प्रतिसाद पथके तैनात करावीत. प्रशिक्षित वन कर्मचारी व पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांचा समावेश असलेली प्रतिसाद पथके तयार करून बिबट्या हल्ल्यांना प्रतिसाद देणे अनिवार्य करावे. केंद्रीय मानक कार्यपध्दतीचे पालन करावे. मानव वन्यजीव संघर्षांच्या सर्व घटनांकवर कारवाई करताना केंद्राने जारी केलेल्या मानक कार्यपध्दतीचे काटेकोर पालन करण्यात यावे.

> ग्रामीण भागातील नागरीकांच्या सुरक्षेचा प्रश्न अत्यंत गंभीर असून यामध्ये कोणतीही दिरंगाई सहन केली जाणार नाही. वन विभागाने स्थानिक पातळीवर जागरूकता वाढवून अधिक सजग आणि जबाबदार भूमिका घ्यावी.
>
> **– नीलेश लंके, खासदार**

# 'भक्ती अन् पर्यावरण संवर्धनाचा संगम'

## स्नेहलता कोल्हे यांच्या हस्ते आषाढी एकादशीनिमित्त तुळशी रोपांचे वितरण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : सर्वत्र भक्तिभावाने साजऱ्या होणाऱ्या आषाढी एकादशी निमित्ताने कोपरगाव शहरात पर्यावरण पूरक उपक्रम राबवून भक्ती आणि पर्यावरण यांचा सुंदर संगम पाहायला मिळाला. छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसरात संजीवनी युवा प्रतिष्ठान आणि भारतीय जनता पार्टी, कोपरगाव शहराच्यावतीने माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांच्या हस्ते पवित्र तुळशी रोपांचे



वाटप व प्रसाद वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात श्री विठ्ठल-रुक्मिणी यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. युवानेते विवेक कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देतानाच भक्तीभाव जागवणारा हा उपक्रम असल्याने भाविकांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला.

दरवर्षीप्रमाणे राज्यभरातून लाखो वारकरी पान ४

> **स्नेहलता कोल्हेंकडून वारकऱ्यांना शुभेच्छा**
>
> कोपरगावमध्ये राबवलेला तुळशी वाटप उपक्रम हीच वारकरी भावनेची आणि पर्यावरणप्रेमाची आधुनिक अभिव्यक्ती आहे. या प्रकाराची भावना व्यक्त करत स्नेहलता कोल्हे यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या.

# वांबोरी चारी दुरुस्तीसाठी १४ कोटी मंजूर : आ. कर्डिले

## जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखेंकडे केली होती मागणी; अखेर डॉ. सुजय विखेंच्या प्रयत्नांतून निधी मंजूर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**करंजी** : राहुरी, नगर, पाथर्डी, नेवासा तालुक्यातील ४३ गावांमधील १०२ पाझर तलावासाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या वांबोरी चारी टप्पा एकच्या दुरुस्ती कामासाठी जलसंपदा विभागाकडून १४ कोटी ६० लक्ष ६२ हजार रुपयांचा निधी मंजूर झाला असल्याची माहिती आ. शिवाजीराव कर्डिले यांनी दिली आहे.

मंजूर झालेल्या निधीच्या बाबत अधिक माहिती देताना आ. कर्डिले म्हणाले की, वांबोरी चारी टप्पा एकमधील अनेक पाझर तलावामध्ये पाणी पोहोचत नाही. या सर्व तांत्रिक अडचणी दूर करून प्रत्येक लाभधारक तलावात पाणी पूर्ण दाबाने पोहोचावे व लाधारक शेतकऱ्यांना या टप्पा एकच्या योजनेचा निश्चितपणे लाभ व्हावा, यासाठी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे वांबोरी चारी टप्पा एकच्या दुरुस्ती कामासाठी निधीची मागणी करण्यात आली होती.



यासाठी माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी देखील प्रयत्न केले आणि म्हणूनच या योजनेच्या दुरुस्ती कामासाठी १४ कोटी ६० लक्ष रुपयांच्या निधीला मंजुरी मिळाली असून या निधीच्या माध्यमातून मुळा धरणावरील पंप हाऊस दुरुस्ती, मुख्य पाईप लाईनच्या वितरण व्यवस्थेची कामे, तसेच एअरवॉल चेंबर नवीन बसवणे अथवा दुरुस्ती करणे, यांत्रिकी व विद्युत कामांची दुरुस्ती करणे अशा पाणी व्यवस्थेसाठी अडथळा ठरणाऱ्या सर्व अडचणी या निधीच्या माध्यमातून आता दूर केल्या जाणार आहेत.

ज्या तलावांमध्ये या योजनेचे पाणी पोहोचत नव्हते, ते सर्व येणारे अडथळे अडचणी या निधीच्या माध्यमातून आता दूर केल्या जाणार आहेत. वांबोरी चारी टप्पा एकच्या पाण्यापासून अनेक गाव तलाव वंचित आहेत. अशा लाभधारक शेतकऱ्यांना आता हक्काचे पाणी देण्यासाठी या निधीला मंजुरी मिळणे महत्त्वाचे होते.

> **शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण योजना**
>
> वांबोरी चारी टप्पा एकमध्ये राहुरी, नगर, पाथर्डी, नेवासा तालुक्यातील ४३ गावांचा समावेश आहे. १०२ लाभधारक पाझर तलाव असुन मुळा धरणातून ६८० एमसीप्टी पाणी यासाठी राखीव असुन या पाण्यामुळे ३५६८ हेक्टर क्षेत्र या योजनेच्या पाण्यामुळे सिंचनाखाली येणार आहे. त्यामुळे ही योजना शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानली जाते.

> जलसंपदा मंत्री विखे पाटील यांनी या निधीला मंजुरी दिल्याने लवकरच वांबोरी चारी टप्पा एकच्या दुरुस्तीला सुरुवात होईल आणि या योजनेच्या शेवटच्या तलावापर्यंत पाणी पोहोचवण्याचा प्रयत्न राहणार आहे.
>
> **– शिवाजीराव कर्डिले, आमदार**

## संमिश्र

### नक्षली स्नायपर-डेप्युटी कमांडर ठार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**विजापूर** :छत्तीसगडमधील बिजापूर जिल्ह्यातील राष्ट्रीय उद्यान परिसरात सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक झाली आहे. या चकमकीत डेप्युटी कमांडर आणि स्नायपर सोधी कन्ना, ज्याच्या डोक्यावर ८ लाख रुपयांचे बक्षीस होते, तो मारला गेला. त्याचा मृतदेह आणि ३०३ रायफल जप्त करण्यात आली आहे. बिजापूरचे पोलिस अधीक्षक जितेंद्र यादव म्हणाले की, जिल्ह्यातील राष्ट्रीय उद्यान परिसरात माओवादी कार्यकर्त्यांच्या हालचालींबद्दल माहिती मिळाली होती. त्यावरून डीआरजी बिजापूर, डीआरजी दंतेवाडा, एसटीएफ, कोब्रा २०२, कोब्रा २१० आणि सीआरपीएफ यांचे संयुक्त पथक ४ जुलैपासून शोध मोहिमेवर पाठवण्यात आले.

### कावडीयांसाठी कॉरिडॉर बांधणार: अखिलेख यादव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लखनौ** : सपा प्रमुख अखिलेश यादव म्हणाले- जर सपा सरकार स्थापन झाले तर आम्ही कावडीयांसाठी स्वतंत्र कॉरिडॉर बांधू. यामुळे दुकानदारांना किंवा रस्त्यावरून चालणाऱ्या लोकांना कोणतीही गैरसोय होणार नाही. ते म्हणाले- भाजपमध्ये तीन गट आहेत. पहिला- स्वतः. मुख्तार, दुसरा- दिल्लीचा उमेदवार. तिसरा- आघाडीतील भागीदार उमेदवार. भाजप सरकारमध्ये मोठमोठे ट्रस्ट पार्क आणि तलाव उघडपणे ताब्यात घेतले जात आहेत. सोमवारी लखनौ येथील सपा कार्यालयात अखिलेश यांनी पत्रकार परिषद घेतली. ते म्हणाले- भाजप सरकारच्या काळात नद्यांची स्थिती वाईट आहे. संपूर्ण राज्यातील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प बंद करण्यात आले आहेत.

### पानिपतच्या मुलीने अमेरिकेत जिंकले २ गोल्ड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मातालौदा** : पानिपतमधील नौलथा गावची मुलगी आणि आयटीबीपीमध्ये कॉन्स्टेबल असलेली नीतू जगलान हिने अमेरिकेतील बर्मिंगहॅम येथे एक नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. तिने २१ व्या जागतिक पोलिस आणि अग्निशमन क्रीडा स्पर्धा २०२५ च्या कराटे स्पर्धेत एकेरी आणि दुहेरी दोन्ही प्रकारात सुवर्णपदके जिंकली. नीतूचे हे पहिले आंतरराष्ट्रीय यश नाही. तिने २०१९ मध्ये चीनमध्ये झालेल्या कराटे स्पर्धेत सुवर्णपदक आणि २०२३ मध्ये नेदरलँड्समध्ये रौप्यपदक जिंकले होते. सध्या ती हरियाणातील पंचकुला येथे आयटीबीपी (इंडो तिबेटीयन बॉर्डर पोलिस)मध्ये कॉन्स्टेबल म्हणून कार्यरत आहे.



# महाराष्ट्रात सुख-समृद्धी, बंधुभाव नांदू दे!

## माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांची पंढरपूरच्या पांडुरंग चरणी प्रार्थना

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** पंढरपूरचा पांडुरंग हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत आहे. आषाढी वारीला शेकडो वर्षांची परंपरा असून वारकरी संप्रदायाने बंधुभाव आणि मानवतेची शिकवण सर्वांना दिली आहे. ही संस्कृती मानवतेला साद घालणारी असून महाराष्ट्रात सुख समृद्धी, बंधुभाव नांदू दे. राज्यात भरपूर पाऊस पडून बळीराजा सुखी होऊ दे, अशी प्रार्थना महाराष्ट्राचे माजी महसूल व कृषिमंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी पांडुरंग चरणी केली आहे.

संगमनेरमधील चैतन्य नगर येथील विठ्ठल मंदिरात काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्गीय कमिटीचे सदस्य माजीमंत्री बाळासाहेब थोरात व कांचन थोरात यांच्या हस्ते विठ्ठल व रुक्मिणीची आरती व पूजा करण्यात आली.

याप्रसंगी मा. आ. डॉ. सुधीर तांबे, आ. सत्यजित तांबे, डॉ. जयश्री थोरात, डॉ. मैथिली तांबे, विश्वासराव मुर्तडक, सोमेश्वर दिवटे, वैष्णव मुर्तडक, नाना देशमुख, सुभाष ताजने, श्याम अभंग, नितीन अभंग, डॉ. निलेश सातपुते, बाबा मंडलिक, सौरभ कोल्हे, रामनाथ अभंग, गजेंद्र अभंग, मिलिंद औटी, प्रमिला अभंग, रवींद्र बडे, सुदर्शन पलोड, जीवन पांचारिया, आशिष कोठवळ, प्रशांत अभंग, दत्ता चव्हाण, सतीश बोरकर, राहुल चौधरी, आलोक बर्डे आदी उपस्थित होते.

यावेळी माजीमंत्री थोरात व सौ. थोरात यांच्या हस्ते विठ्ठल रुक्मिणीची पूजा करण्यात आली.



आ. तांबे म्हणाले की, महाराष्ट्र धर्म हाच खरा धर्म आहे. हा मानवतेचा धर्म जपण्याचे विचार साधु संत व महात्म्यांनी दिले आहे.संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ, संत जनाबाई,चोखामेळा अशी थोर परंपरा वारकरी संप्रदायाची आहे.

डॉ. जयश्री थोरात म्हणाल्या की, आषाढी वारी हा महाराष्ट्राचा आनंद सोहळा आहे. लाखो वारकरी देवाच्या दर्शनाला जातात हा दिवस अत्यंत पवित्र मानला जातो. संगमनेर मध्ये मोठ्या उत्साहाने सर्वत्र आषाढी एकादशी साजरी केली जात आहे.

> आषाढी एकादशीचा दिवस हा संपूर्ण महाराष्ट्रात मोठ्या भक्ती भावाने साजरा केला जातो. पंढरपूरचा पांडुरंग हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत आहे. पिढ्यानपिढ्यांची परंपरा वारीची आहे. वारीमध्ये सर्व मतभेद विसरून एकत्र पायी चालत जातात. महिनाभर महाराष्ट्रात लाखो वारकरी पंढरीची वाट चालत असतात. कळसाचे दर्शन जरी झाले. तरी हे सर्व वारकरी आनंद मानतात आणि वर्षभर हा आनंद घेऊन जीवनात उत्साहाने काम करतात. आषाढी एकादशी आणि पायी दिंडी सोहळा वारी ही महाराष्ट्राची आदर्श परंपरा असून मानवतेला साद घालणारी आहे. एक आगळ वेगळं तिचे वैशिष्ट्य आहे.
>
> **– बाळासाहेब थोरात, माजी मंत्री**

# मुलांची आवड हेच मुलांचे करीयर : घुगे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड** : पालकांना मुलांची क्षमता व मुलगा पुढे काय होऊ शकतो हे समजले पाहिजे. मोठ्या इन्स्टिट्यूटला एडमीशन घेतले म्हणजे मुलगा डॉक्टर व इंजिनिअर होतो असे नाही. स्पर्धेत उतरायचे आसेल तर विद्यार्थींना स्पर्धा माहिती असली पाहिजे. तसेच पालकांना विद्यार्थ्यांनं बाबत स्पर्धापरीक्षेची जाणीव व जागरूकता असली पाहिजे असे मत प्रमुख मार्गदर्शक संचालक दि ब्रेनस्मिथस् कन्सल्टन्सीचे विष्णु घुगे यांनी विद्यार्थ्यांना व पालकांना मार्गदर्शन करताना व्यक्त केले.



जामखेड येथील व्हिजन कॅडमीच्या वतीने विद्यार्थी, पालक व शिक्षक यांच्यासाठी मोफत मार्गदर्शन शिबीर व जनरल नॉलेज परीक्षेचा बक्षिस वितरण सोहळा, नुकताच दि. ५ जुलै रोजी सायंकाळी महावीर मंगल कार्यालय जामखेड याठिकाणी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. शिबिरात प्रमुख मार्गदर्शक संचालक दि ब्रेनस्मिथस् कन्सल्टन्सी चे विष्णु घुगे सर यांनी उपस्थित विद्यार्थी व पालकांना अतिशय मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून राष्ट्रपती पुरस्कार सन्मानित शिक्षक संदीप पवार हे होते. तर प्रमुख उपस्थितीत समावेशित शिक्षण विभाग प्रामुख, अंबेजोगाईचे प्रकाश हरिश्चंद्र शिंदे, लातूर जिल्हा शिक्षण अधिकारी नागनाथ शिंदे, रमेश पवार, ड. धिरज शिंदे, सुरेश घुगे, जाकीर शेख, अशोक यादव, केशव कोल्हे, एकनाथ चव्हाण यासह पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे आयोजन व्हिजन अकॅडमी जामखेडचे संचालक धीरज शिंदे व शाखा व्यवस्थापक उमेश घुगे यांनी केले. तर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन हनुमंत निकम व संतोष सरसमकर यांनी केले.

> शिक्षणाच्या संधी प्राप्त करायच्या असतील तर शिक्षणाची गती पकडायला पाहिजे, आजचा काळ स्पर्धेचा आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना पाचवी सहावी पासुनच फौडेशनचा अभ्यास महत्त्वाचा आहे. जामखेडसारख्या ठिकाणी व्हीजन कॅडमीने विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करून दिली आहे.
>
> **– नागनाथ शिंदे,**
> जिल्हा शिक्षणाधिकारी

# कृष्णाली फाऊंडेशनचा उपक्रम दिशादर्शक : लंके

## जिल्हा परिषद शाळेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांचा गौरव



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** जिल्हा परिषद शाळेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांचा कृष्णाली फाउंडेशनच्या वतीने सन्मान करण्यात आला. तर विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करुन गुणवंतांचा गौरव करण्यात आला. कर्जुने खारे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत हा उपक्रम राबविण्यात आला.

माजी जिल्हा परिषद सदस्या राणीताई लंके यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाप्रसंगी युवा शास्त्रज्ञ डॉ. रणजीत राऊत, डॉ. जयेश कांबळे, छाया निमसे, रामेश्वर निमसे, संग्राम आंधळे, शिवाजी उबाळे, गावचे माजी उपसरपंच अंकुश शेळके, उपसरपंच रामेश्वर निमसे, नवनाथ शिंदे, वजीर शेख, गणेश तोरडमल, भागवत शेळके, भारत बोबडे, स्वप्नील निमसे, गणेश मोरे, अमर बोबडे, कैलास लांडे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. शाळेतील मुलींनी स्वागत गीत सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे सचिव प्रियंका पाटील शेळके यांनी केले. इयत्ता पहिलीमध्ये प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांचा उपस्थितांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उद्धव कालापहाड यांनी केले. आभार कैलास लांडे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी उद्योजक सागर गांधी व संग्राम आंधळे यांचे सहकार्य लाभले.

> जिल्हा परिषद शाळेत सर्वसामान्यांची मुले शिक्षण घेतात. त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे आणि मराठी माध्यमांच्या शाळांना चालना देण्याच्या उद्देशाने कृष्णाली फाउंडेशनचे अध्यक्ष प्रशांत शेळके यांनी हा अनोखा उपक्रम राबविण्यात आला होता.
>
> **– राणी लंके, माजी सदस्य– जिल्हा परिषद**

# वारकरी संप्रदाय सामाजिक एकोप्याचे प्रतीक

## बाबासाहेब वाकळे; सावेडी गावात आषाढी एकादशीनिमित्त भजन, कीर्तन व महाआरती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : सावेडी गावात आषाढी एकादशीनिमित्त श्री संत तुकाराम महाराज मंदिरात पारंपरिक भक्तिरसाने भरलेला धार्मिक महोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या पवित्र दिवशी विठ्ठल-रुक्मिणीच्या मूर्तीची महापूजा, महाआरती, भजन, कीर्तन व संगीताचा कार्यक्रम भाविकांच्या मोठ्या उपस्थितीत पार पडला.

या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे, संगीत सुरांच्या माध्यमातून अध्यात्मिक उन्नती साधणारे भजन-कीर्तन आणि ग्रामस्थांना एकत्र आणणारे भाविकतेचे वातावरण. सावेडी गावाला १०० वर्षांची वारकरी परंपरा लाभलेली असून, ही परंपरा जोपासण्यासाठी श्री संत तुकाराम प्रतिष्ठानकडून विविध उपक्रमांचे आयोजन दरवर्षी केले जाते.



यावर्षी आषाढी एकादशीनिमित्त आयोजित कार्यक्रमात मंदिरात फुलांनी सजवलेली आकर्षक विद्युत रोषणाई, भक्तिरसात न्हालेला परिसर आणि संत तुकाराम महाराज यांच्या अभंगांनी भारलेले वातावरण पाहायला मिळाले. मा. महापौर बाबासाहेब वाकळे यांच्या पुढाकाराने आयोजित हा कार्यक्रम अगदी पंढरपूरच्या वारीचा अनुभव देणारा ठरला.

कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, महाराष्ट्राला संतांची, साधूंची पवित्र परंपरा लाभली आहे. संतांच्या विचारांमुळे समाजात आध्यात्मिक चेतना जागृत होत असून युवा पिढीला प्रेरणा देणारे हे कार्यक्रम संस्कृती जोपासणारे आहेत. असे ते म्हणाले.

मा. महापौर बाबासाहेब वाकळे म्हणाले की, संत तुकाराम महाराज यांच्या अभंगातून विठ्ठल-रुक्माईचे साक्षात दर्शन घडते. सावेडी गावामध्ये दरवर्षी होणारे हे आयोजन भक्तीचा झरा अखंड वाहत ठेवते. या कार्यक्रमात माजी उपमहापौर अनिल बोरुडे, माजी सभागृह नेते रवींद्र बारस्कर, माजी नगरसेवक विलास ताठे, श्रीराम तांबोळी, मनोज ताठे, मुकुल गंधे, महेश काळे, पुष्कर कुलकर्णी, अशोक गायकवाड, गजानन वाकळे, संदीप पिंपळे, प्रसाद भडके यांच्यासह अनेक मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात भावस्पर्शी भजन, तालबद्ध वाद्यवृंद व विविध वाद्यांच्या साथीत सादर करण्यात आलेल्या संत वाणीच्या गजरांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. स्थानीक कलाकारांनी पारंपरिक वारकरी वेशभूषेत विठ्ठलनामाचा जयघोष करत भावनिक वातावरण निर्माण केले. सावेडी गावामधील वारकरी संप्रदाय ही केवळ एक परंपरा नाही, तर सामाजिक एकोप्याचे, साधनेचे आणि मूल्यांचे प्रतीक मानली जाते. आजच्या धकाधकीच्या जीवनात, अशा कार्यक्रमांद्वारे नव्या पिढीत अध्यात्मिक मूल्यांची रुजवणूक होत आहे, असे मत मा. महापौर बाबासाहेब वाकळे यांनी यावेळी व्यक्त केले.

# नळवंडे धरणातून विसर्ग सुरु

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नगर** : निळवंडे (उर्ध्वप्रवरा) धरणातून आज सोमवार, दि.७ जुलै २०२५ रोजी सकाळी ९ वाजता ६५७० क्युसेक्स पाण्याचा विसर्ग प्रवरा नदी पात्रात सोडण्यात आला आहे.

# ... तरच अवैध सावकारीला आळा बसेल?

## सावकाराकडून होणाऱ्या पिळवणुकीला कायद्याचे कवच; गुन्हाही दाखल करता येणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : आजच्या धकाधकीच्या युगात बऱ्याच जणांना पैशाची अडचण येत असते. अगदी मुलांच्या शिक्षणापासून ते लग्नासाठी, शेतीच्या वेगवेगळ्या गोष्टीसाठी, अनेक जण हे लगेच पैसे उपलब्ध होतात. म्हणून खाजगी सावकाराकडे जातात व आपली गरज भागवतात. पण पुढील गंभीर परिणामाची त्यांना कुठलिही कल्पना नसते.

अनेक जण या सावकारकिच्या जाचाला कंटाळून आत्म हत्यासारखे पाऊल उचलतात. ग्रामीण भागात याच सावकारकीम ुळे अनेक कुटुंब उध्वस्त झाले आहेत. सावकाराकडून होणाऱ्या पिळवणुकीस महाराष्ट्र शासनाने दिनांक १६ सप्टेंबर २०१४ रोजी या छळास प्रतिबंध व कठोर उपाययोजनेसाठी कायदा अस्तित्वात आणला.

अनेकदा सावकार शेतकऱ्याला कर्ज देताना एक व्याजाचा आकडा सांगतो. पण ज्यावेळेस शेतकरी कर्ज परतफ ेड करत असतो. त्यावेळेस त्याच्या डोक्यावर सावकाराच्या व्याजाचा डोंगर चढलेला असतो आणि याच चिंतेने बरेचसे कुटुंब उदध्वस्त झालेले आहेत.



शासनाने सावकाराना किती व्याज घेता येते. हे देखील ठरून दिलेले आहे. शासनाने ठरून दिलेल्या व्याजाचे दर हे सावकारी करत असलेल्या ठिकाणी दर्शनी भागात लावणे गरजेचे आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात जिल्हा निबंधक यांनी आतापर्यंत १४० सावकाराना अधिकृत व्यवसाय करण्याचा परवाना दिलेला आहे. यामध्ये शेतकऱ्यांना तारण कर्ज हे ९ टक्के प्रतिवर्षी व विनातारण कर्ज हे १२ टक्के प्रतिवर्षी या दराने परवाना धारक सावकारस शासनाने ठरून दिले आहे. तसेच शेतकऱ्यां व्यतिरिक्त इतर व्यक्तींना तारण कर्ज हे १५ टक्के प्रतिवर्षी व विनातारण कर्ज हे १८ टक्के प्रतिवर्षी या दराने देण्यास शासनाने मंजुरी दिलेली आहे.

तसेच कलम ३१ (१) अन्वये अनुसूचित जाती-जमाती मध्ये सावकाराने आकारावयाचे व्याज हे संबंधित ग्रामसभेत निश्चित केलेल्या दरानुसार व्याज आकारता येईल व तसा फलक सावकाराने दर्शनी भागात लावणे गरजेचे आहे. आतापर्यंत जिल्ह्यात खाजगी सावकाराच्या कारवाईत आढळून आलेल्या २० प्रकणामध्ये संबंधित तालुका पोलीस स्टेशनमार्फत गुन्हे दाखल करण्यात आहे.

१११ अपिलापैकी १९ अपिलामध्ये काही शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनी व बांधकाम केलेले क्षेत्र तक्रारदारास परत करण्याचे आदेश देण्यात आलेले आहे.

# डॉ. मुखर्जींनी भाजपाचे वटवृक्षात रूपांतर केले

**शहर जिल्हाध्यक्ष मोहिते; भाजपाच्या वतीने डॉ. मुखर्जी यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन**

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** भारतीय जनता पार्टीचे संस्थापक डॉ. श्यामप्रसाद मुखर्जी यांनी एक देश एक कायदा असला पाहिजे हा नारा दिला होता. त्यांचे बलिदान वाया न जाऊन देता स्वप्न पूर्ण करण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी करत आहे. डॉ. श्यामप्रसाद मुखर्जी यांनी भारतीय जनता पार्टीचे लावलेल्या रोपट्याचे वटवृक्षात रूपांतर झाले आहे. राष्ट्रसर्वतोपरी या विचारांचे जनक डॉ. मुखर्जी हे आहेत, आजही संपूर्ण भाजपा कार्यकर्ते या विचारांचे पाईक म्हणून अखंड सेवारत आहेत, असे प्रतिपादन शहर भाजपाचे जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांनी केले.



> काश्मीरच्या विशेष दर्जाच्या विरोधात त्यांनी भूमिका घेतली त्यामुळेच त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा देत १९५१ साली 'भारतीय जनसंघ' या राजकीय पक्षाची स्थापना केली. याच जनसंघातून पुढे भारतीय जनता पक्षाची निर्मिती झाली. डॉ. मुखर्जी यांचे सर्वात मोठे योगदान म्हणजे 'एक देश-एक संविधान' या तत्त्वासाठी त्यांनी लढा दिला. ते काश्मीरमध्ये भारतीय संविधानाचा पूर्ण अंमल व्हावा, अशी भूमिका घेत होते.
>
> **– बाबासाहेब वाकळे, माजी महापौर**

अहिल्यानगर शहर भाजपाच्या वतीने डॉ. मुखर्जी यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेस पुष्पहार अर्पण करताना भाजपाचे शहर जिल्हाअध्यक्ष अनिल मोहिते, मा. महापौर बाबासाहेब वाकळे, मा. उपमहापौर अनिल बोरुडे, मा. सभापती पुष्पाताई बोरुडे, मा. सभागृह नेते रवींद्र बारस्कर, मा. नगरसेवक दगडूमामा पवार, विलास ताठे, अशोक गायकवाड, मुकुल गंधे आदी उपस्थित होते.

मा. सभागृह नेते रवींद्र बारस्कर म्हणाले की, डॉ. श्यामप्रसाद मुखर्जी हे केवळ राजकारणी नव्हते, तर ते एक दूरदृष्टी असलेले राष्ट्रनिष्ठ विचारवंत आणि वैचारिक योद्धा होते. त्यांचे जीवन आणि कार्य नव्या पिढीला देशासाठी समर्पित राहण्याची प्रेरणा देणारे आहे.

# मनोज तरटे यांचे अकस्मात निधन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : केडगाव येथील मोहिनीनगर भागातील रहिवासी मनोज सुभाष तरटे (वय २४) याचे ६ जुलै रोजी निधन झाले. याप्रकरणी कोतवाली पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली आहे.

# टाळ-मृदुंगाच्या गजरात रंगली 'गौतम'ची दिंडी

## आ. आशुतोष काळे, चैताली काळे यांनी दिल्या आषाढी एकादशीच्या शुभेच्छा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी :** आषाढी एकादशी निमित्त कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटी संचलित गौतम पब्लिक स्कूलमध्ये टाळ-मृदंगाच्या साथीने विद्यार्थ्यांचा दिंडी व रिंगण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. वारकऱ्यांची वेशभूषा, मुखी हरिनामाचा जागर करीत शाळेतील विद्यार्थी वारीच्या आनंद सोहळ्यात मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. यावेळी शाळेचे प्राचार्य नूर शेख यांच्या हस्ते पंढरीच्या विठुरायाची व रुक्मिणी मातेच्या पालखीचे पूजन करण्यात आले.



महाराष्ट्राच्या मराठमोळ्या परंपरांचा वारसा पुढच्या पिढीपर्यंत जाणीवपूर्वक घेवून जाण्यासाठी संस्थेच्या सचिव चैतालीताई काळे यांच्या संकल्पनेतून शालेय व्यवस्थापन तसेच शाळेचे प्राचार्य नूर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेत विविध सण उत्सव मोठ्या उत्साहात व धार्मिक वातावरणात साजरे केले जातात. त्याप्रमाणे आषाढी एकादशीचा सोहळा देखील साजरा करण्यात आला.

> **विठू नामाच्या गजराने परिसर दणाणला**
>
> आषाढी एकादशीनिमित्त गौतम पब्लिक स्कूल ते शहाजापुर येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरापर्यंत भव्य पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी या सोहळ्याचे खास आकर्षण ठरला विश्वास नावाचा अश्व. या अश्वाने यावेळी केलेले नृत्य व मारलेली प्रदक्षिणा, विठ्ठल-रखुमाई व वारकऱ्यांच्या पारंपरिक वेशभूषेतील शेकडो विद्यार्थ्यांच्या विठू नामाच्या जय घोषाने परिसर दणाणून गेला होता.

संस्थेचे चेअरमन मा. आ. अशोकराव काळे, संस्था विश्वस्त आ. आशुतोष काळे, सचिव चैताली काळे, संस्था विश्वस्त, प्राचार्य नूर शेख यांनी आषाढी एकादशीच्या शुभेच्छा दिल्या.

आषाढी एकादशीच्या यशस्वीतेसाठी सुधाकर निलक, रमेश पटारे, राजेंद्र आढाव, इसाक सय्यद, रेखा जाधव, गोरक्षनाथ चव्हाण व सर्व हाऊस मास्टर्स आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# नवीन वीज मिटर ग्राहकांच्या माथी

## सरकारचा आदेश नाही; ठेकेदार आणि खाजगी एजंटची बळजबरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड** : जामखेड तालुक्यातील अनेक गावांमध्ये नवीन मीटर राजरोसपणे बसवण्याचे काम सुरू असून, याबाबत मुख्यमंत्र्यांचा किंवा सरकारचा कोणताही अधिकृत आदेश नसल्याचे समोर आले आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून, ठेकेदार, संबंधित कंपनीचे कर्मचारी आणि खाजगी एजंट यांच्यावर कारवाई करण्याची मागणी जामखेड व खर्डा येथील स्थानिक नागरिकांनी केली आहे.

सदर अर्जात नुमद म्हटले आहे की, जामखेड तालुक्यामध्ये तसेच खेडोपाडी राजरोसपणे नवीन मीटर बसवण्याच्या काम जोमात सुरू आहे. परंतु मुख्यमंत्री यांच्याकडून या प्रकारे कुठलेही जीआर किंवा आदेश अद्याप देण्यात आला नाही. ह्या नवीन मीटरच्या नावाखाली खेडोपाडी नागरिकांची फसवणूक होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

यामध्ये भविष्यामध्ये आर्थिक आणि मानसिक फसवणूक झाल्यास याला जबाबदार कोण? त्यामुळे ठेकेदाराच्या काम सखोल चौकशी करून तसेच नागरिकांची फसवणूक होणार नाही याकरिता तात्काळ आपण कारवाई करावी व आतापर्यंत किती गावांमध्ये घरांमध्ये मीटर बसवले ? तसेच ह्या लोकांना कोणाचे आदेश होते?कोणाच्या आदेशाखाली हे काम सुरू आहे याची मला लवकरात लवकर माहिती मिळावी अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

सहाय्यक पोलीस निरीक्षक उज्वलसिंह राजपूत यांनी सकारात्मक प्रतिसाद देत लवकरच चौकशी करून माहिती कळविले जाईल असे आश्वसन यावेळी दिले आहे.

सदर अर्जावरती उमेश काळदाते, वैभव लटपटे, धनसिंग साळुंखे, विकास शिंदे, आसाराम गीते, गोकुळ गोलेकर, आशुतोष गायकवाड, राजेंद्र चव्हाण अशा अनेक खर्डा व राजुरी येथील नागरिकांच्या सह्या आहेत.

नागरिक आणि ग्रामस्थ यांनी एकत्रितपणे पुढाकार घेऊन या प्रकरणाची चौकशी व्हावी, याकरिता खर्ड्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक उज्वलसिंह राजपूत यांना निवेदन देवून कंपनीचे ठेकेदार व कर्मचारी आणि एजंट यांच्या चौकशीची मागणी केली आहे.




# ख्रिस्ती वधू- वर परिचय मेळावा उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हार :** साप्ताहिक उपदेशक व सेंट मार्टिन चर्च आयोजित सर्व पंथीय ख्रिस्ती वधू- वर परिचय मेळावा कोल्हार येथील सेंट मार्टिन चर्चमध्ये उत्साहात संपन्न झाला. नाशिक धर्मप्रांतचे बिशप रा. रेव्ह एम. यु. कसाब हे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

या कार्यक्रमासाठी ज्ञानेश्वर रघुनाथ खर्डे पाटील (संचालक प. डॉ. वि. विखे पाटील सहकारी साखर कारखाना), रेव्ह विश्वास चक्रनारायण (प्रिष्ट इन्चार्ज सेंट मार्टिन चर्च कोल्हार), अनिल भालेराव (कार्यकारणी सदस्य, नाशिक धर्मप्रांत), अनिल भोसले, अॅड. मंगला दुशिंग, माजी मुख्याध्यापिका, प्रा. चंद्रशेखर थोरात, लुसी पवार, राजाभाऊ साळवे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस प्रार्थना होऊन मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विक्रम गायकवाड यांनी केले तर रेव्ह डि. प्रकाश लोखंडे यांनी आलेल्या पाहुण्यांचा परिचय करून दिला. या उपक्रमाच्या माध्यमातून सुमारे ५० युवक युवतींचा परिचय देण्यात आला. कार्यक्रमा दरम्यान रेव्ह डि प्रकाश लोखंडे यांच्या कुटुंबीयांकडून प्रिती भोजन देण्यात आले.



# प्राध्यापकाच्या घरी चोरी; लाखोंचा ऐवज लंपास

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : शहरात प्राध्यापकाच्या बंद घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने लाखोंचा ऐवज चोरुन नेला. ही घटना कल्याण रोड वरील शिवाजी नगर येथे ६ जुलै रोजी सायंकाळी उघडकीस आली आहे. प्राध्यापक अविनाश मच्छिंद्र हंडाळ (वय ३६, रा. शिवाजीनगर कल्याण रोड, मूळ रा. भातकुडगाव ता. शेवगाव) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

फिर्यादी हे छत्रपती अभियांत्रिकी महाविद्यालयात प्राध्यापक असून त्यांची पत्नी स्वाती हंडाळ या देखील पेमराज सारडा महाविद्यालयात प्राध्यापक आहेत. फिर्यादी यांची पत्नी माहेरी भातकुडगाव येथे गेलेली होती. ४ जुलै रोजी फिर्यादी यांचा मुलगा आजारी असल्याने फिर्यादी हे त्यांच्या मूळगावी भातकुडगाव येथे गेले होते. तेव्हा त्यांनी घर व्यवस्थित लॉक केलेले होते. मात्र ६ जुलै रोजी सायंकाळी शेजाऱ्याचा फोन आला व त्यांनी तुमच्या घराचा दरवाजा उघडा असल्याचे सांगितले.



### घराचे कुलूप तोडून केली चोरी

मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून चोरट्यांनी कपाटातील कपडे आणि साहित्य अस्ताव्यस्त केले होते. घरातील कपाटातील १ लाख ६० हजारांची रोख रक्कम आणि २ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने असा ऐवज घरातून चोरीस गेला असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.त्यानंतर त्यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात जावून फिर्याद दिली. या फिर्यादीवरुन पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दळवी हे करीत आहेत.

# ऊस शेती कार्यशाळा शेतकऱ्यांचा प्रतिसाद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हार** : कोल्हार बुद्रुक (ता. राहाता) येथील तीन चारी येथे ऊस शेती आणि सेंद्रिय शेती यावरील विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचे आयोजन कृषक गटाचे सदस्य पांडुरंग राऊत यांच्या पुढाकाराने करण्यात आले. कार्यशाळेला राहाता येथील कृषी अधिकारी विनया बनसोडे यांच्यासह अनेक महिला व पुरुष शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मार्गदर्शनाचा लाभ घेतला.



कार्यक्रमात ऊस शेती कशी फायदेशीर ठरू शकते, यावर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. रोपवाटिकेपासून थेट ऊस लागवड केल्यास मजुरी व आर्थिक खर्च कसा कमी करता येतो, याचे सविस्तर विवेचन बनसोडे यांनी सहज सोप्या भाषेत मांडले. तसेच, सेंद्रिय शेतीचे महत्त्व, जैविक खतांचा प्रभावी वापर, जमिनीची सुपीकता टिकवून ठेवण्याचे उपाय आणि सेंद्रिय पद्धतीने ऊस उत्पादन वाढवण्याच्या धोरणांवर देखील सखोल मार्गदर्शन करण्यात आले. शेतकऱ्यांनी प्रश्न विचारून उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

या कार्यशाळेसाठी विनय भाकरे (उप कृषी अधिकारी, लोणी), मीना जाधव (सहाय्यक कृषी अधिकारी, कोल्हार बुद्रुक) कृषक गटाचे सदस्य तसेच अनेक प्रगतीशील शेतकरी उपस्थित होते.

कार्यक्रमानंतर मार्गदर्शन करताना ज्ञानेश्वर खर्डे यांनी सांगितले की, नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने प्रत्येक शेतकऱ्याच्या दारापर्यंत पोहोचण्याचा संकल्प घेतला आहे. या उपक्रमातून प्रेरणा घेऊन कोल्हार बुद्रुक परिसरातील प्रत्येक वस्तीवर अशा कार्यशाळांचे आयोजन करण्यात येणार आहे, जेणेकरून अधिकाधिक शेतकरी सेंद्रिय ऊस शेतीकडे वळतील.

# कृत्रिम अवयव वितरण शिबिराचे उद्घाटन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** भारत सरकारच्या भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम, कानपूर व एस.आर. ट्रस्ट, मध्य प्रदेश, डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशन संचलित, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण विभाग अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र येथे मोफत कृत्रिम अवयव शिबीर पार पडले.



या कार्यक्रमास प्रशांत गायकवाड, (जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी), डॉ. अभिजित दिवटे (संचालक, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र), एस. एस. चुमले, (एलिम्को), डॉ. रुपेश जाधव (संचालक, एस. आर. ट्रस्ट), डॉ. दिपक अनाप व डॉ. अभिजित मेरेकर प्रकल्प समन्वयक व जिल्हा समाज कल्याण विभाग व जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

या प्रसंगी प्रास्तविक भाषणात डॉ. दिपक अनाप यांनी सांगितले की, दिव्यांग योजना प्रत्येक लाभार्थ्यांपर्यंत पोहचाव्यात, यासाठी डॉ. सुजय विखे पाटील (अध्यक्ष, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र) यांचा नेहमीच पुढाकार असतो. या अगोदर ही प्रत्येक योजनेत जिल्हा प्रथम स्थानावर राहिला आहे आणि याही योजनेत जिल्ह्यातील जास्तीत जास्त दिव्यांग बांधवांना लाभ मिळेल, अशी अशा व्यक्त केली.

### ५३ लाभार्थ्यांना कॅलिपर्सचे वाटप

प्रशांत गायकवाड यांनी सांगितले की दिव्यांग सक्षमीकरण विभाग व जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र नेहमीच एकत्र काम करून दिव्यांगांचा सर्वांगीण विकास करेल. या शिबिरा अंतर्गत एकूण ५३ लाभार्थ्यांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी एकूण ५३ लाभार्थ्यांना तात्काळ कृत्रिम हात, पाय व कॅलिपर्सचे वाटप अतिथींच्या हस्ते करण्यात आले.

# पागोरीत अवैध दारू-मावा विक्री केंद्र

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** तालुक्यातील पागोरी पिंपळगाव हे गाव सध्या अवैध दारू व मावा विक्रीच्या अड्ड्यात रूपांतरित झाले असून, गावातील शांतता व सामाजिक आरोग्यावर गडद छाया पडली आहे.

गावाच्या मध्यवर्ती भागात चार ते पाच ठिकाणी उघडपणे देशी, विदेशी दारू विक्री चालू असून, माव्याचा काळाबाजारही जोमात सुरू आहे. या अवैध धंद्यांमुळे गावातील तरुण पिढी व्यसनाच्या गर्तेत अडकत चालली आहे. गाव व परिसरातील वाड्या-वस्त्यांमधील अनेकजण दारू मिळवण्यासाठी पागोरी पिंपळगाव गाठत आहेत. दारूच्या नशेत अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली असून, गावात सामाजिक व कुटुंबिक अस्थैर्य निर्माण झाले आहे. गावातील काही दारू विक्रेत्यांची इतकी दहशत आहे की, कोणीही त्यांच्या विरोधात बोलण्यास धजावत नाही.



गावाच्या मुख्य चौकात काही विक्रेते राजरोसपणे दारू विक्री करताना दिसतात. ही विक्री नेमकी कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहे, असा प्रश्न ग्रामस्थ विचारू लागले आहेत. गावात मंदिरे, प्रार्थना स्थळे, शाळा या अवैध विक्रीच्या ठिकाणांपासून अवघ्या काही अंतरावर आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांवर व लहानग्यांवर याचा विपरित परिणाम होत असल्याने चिंता व्यक्त होत आहे.

# ज्येष्ठ महिलेचे मंगळसुत्र लांबविले

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** आषाढी एकादशीच्या उपवासासाठी लागणारा किराणा सामान घेऊन घरी परतणाऱ्या सेवानिवृत्त महिला कर्मचाऱ्या धक्का देत मारहाण करत त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र हिसकावून चोरटे पसार झाल्याची घटना सावेडी उपनगरातील मिस्कीन मळा रस्त्यावरील हिरा मोती पान शॉपजवळ ५ जुलै रोजी रात्री घडली.

या प्रकरणी देवयानी रामसिंग रघुवंशी (वय ५७, रा. क्रांती चौक, सिव्हील हाडको, अहिल्यानगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रघुवंशी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार त्या जिल्हाधिकारी कार्यालयात वरिष्ठ लिपिक पदावर कार्यरत होत्या आणि सध्या निवृत्त आहेत. त्या एकट्याच राहत असून निवृत्ती वेतनातूनच उदरनिर्वाह करतात. शनिवारी रात्री ८.३० च्या सुमारास त्या आषाढी एकादशीच्या उपवासासाठी लागणारा किराणा घेण्यासाठी मिस्कीन मळा रस्त्यावरील प्रकाश प्रोव्हिजन स्टोअर्स येथे गेल्या होत्या.



८.४५ वाजता घरी परतत असताना हिरा मोती पान शॉपजवळ त्या पोहोचल्या असता अचानक दुचाकीवरून दोन अज्ञात इसम त्यांच्या समोर आले. दुचाकीच्या मागील सीटवर बसलेल्या व्यक्तीने रघुवंशी यांना धक्का देत हाताने मारहाण केली व त्यांच्या गळ्यातील अंदाजे ३० हजार रूपये किमतीचे १४ ग्रॅम वजनाचे काळ्या मण्याचे सोन्याचे चैन मंगळसूत्र जबरदस्तीने खेचून तोडले. त्यानंतर चोरटे दुचाकीवरून तात्काळ पसार झाले.

दरम्यान, दुचाकीवर मागे बसलेला इसम अंदाजे ३० ते ३५ वर्षे वयाचा व अंगात लाल रंगाचे जर्किन व तोंडावर रूमाल बांधलेला होता. पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरूध्द जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला असून पुढील तपास उपनिरीक्षक दळवी करीत आहेत.

# वकीलांच्या संरक्षणासाठी कायदा करावा

### आमदार सत्यजित तांबे यांची विधान परिषदेत मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** नुकताच २ जुलै रोजी नाशिक जिल्ह्यातील माडसांगवी येथे अॅड. रामेश्वर बोऱ्हाडे यांच्यावर प्राणघातक हल्ला झाला. मागील वर्षी अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये आढाव दांपत्याची निर्घृण हत्या झाली होती. त्यामुळे महाराष्ट्रात वकील बांधवांच्या संरक्षणासाठी तातडीने कायदा लागू करावा, अशी आग्रही मागणी आमदार सत्यजित तांबे यांनी केली आहे.



मुंबई येथे सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात वकील बांधवांच्या संरक्षणार्थ प्रश्न मांडताना आमदार सत्यजित तांबे म्हणाले की, अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यात मागील वर्षी अॅड. राजाराम आढाव व मनीषा आढाव या वकील दांपत्याची अत्यंत निर्गुणपणे हत्या करण्यात आली होती. त्यावेळी वकिलांचा सुरक्षेचा प्रश्न राज्यभर मोठ्या प्रमाणात चर्चेत आला होता. त्यावेळीही १ मार्च २०२४ रोजी अर्थसंकल्पीय अधिवेशनात वकील संरक्षण बाबत कायदा तातडीने लागू करावा याबाबत आवाज उठवला होता. मात्र हा कायदा प्रलंबित राहिला. त्यानंतर २ जुलै २०२५ रोजी नाशिक जिल्ह्यातील माडसांगवी येथे अॅड रामेश्वर बोराडे यांच्यावर अज्ञात तीन व्यक्तींनी प्राण घातक हल्ला केला. ही घटना अत्यंत गंभीर असून यामुळे वकिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

बिहार, झारखंड सारख्या राज्यांनी वकिलांसाठी संरक्षण कायदा केला असून पुरोगामी महाराष्ट्र मात्र अद्यापही या कायद्याबाबत दुर्लक्षित आहे. त्यामुळे गृहमंत्री व विधी मंत्री यांच्याकडे मागणी आहे की, या हल्ल्याची सखोल चौकशी होऊन दोषींवर कठोर कारवाई व्हावी तशी राज्यभरातील वकिलांच्या संरक्षणासाठी तातडीने कायदा करण्यात यावा अशी मागणी त्यांनी केली आहे.

# संगमनेरात वृक्षारोपणावर आधारित कार्बन क्रेडिट प्रकल्प राबवावा

## आमदार सत्यजित तांबे; संगमनेरच्या मुख्याधिकाऱ्यांना दिले निवेदन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : थोर स्वातंत्र्य सेनानी स्व. भाऊसाहेब थोरात यांच्या संकल्पनेतून २००६ साली संगमनेर तालुक्यात व शहरात 'दंडकारण्य अभियान' ही पर्यावरणपूरक चळवळ सुरू झाली. त्यानंतर दुर्गाताई तांबे यांनी नगराध्यक्ष म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर मागील १८ ते २० वर्षांत शहरामध्ये व्यापक प्रमाणावर वृक्षलागवड करण्यात आली.




या नियोजनबद्ध वृक्षारोपणामुळे संपूर्ण शहराचे सुशोभीकरण झाले असून संगमनेर अधिक आकर्षक आणि हरित बनले आहे. जास्त वृक्षामुळे शहराचे तापमान घटले असून पर्यावरण रक्षणासोबत शहरासाठी एक शाश्वत उत्पन्नाचा मार्ग होण्यासाठी कार्बन क्रेडिट प्रकल्प तातडीने राबवावा, अशी आग्रही मागणी आमदार सत्यजित तांबे यांनी केली आहे.

आ. तांबे यांनी दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर हे पुणे-मुंबईसारख्या मोठ्या शहरांनंतर एकमेव असे शहर आहे, जिथे इतक्या मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड झाली आहे आणि केवळ लागवडच नव्हे तर त्याचे संगोपनही अत्यंत नेटकेपणाने झाले आहे. परिणामी संगमनेर नगरपरिषदेला वृक्षारोपण, स्वच्छता व पर्यावरणविषयक उपक्रमांसाठी शासन आणि विविध संस्थांकडून अनेक राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत व भविष्यातही मिळतील, याची खात्री आहे. या यशस्वी वाटचालीची पायाभरणी नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे यांच्या कार्यकाळात झाल्याचे विसरता येणार नाही.

### प्रकल्पातून मिळणार अर्थिक उत्पन्न

पर्यावरणीय पुढाकाराचे मॉनिटायझेशन करण्याची आणि त्यातून उत्पन्नाचे शाश्वत स्रोत निर्माण करण्याची. यासाठी कार्बन क्रेडिट हा एक अत्यंत उपयुक्त आणि जागतिक पातळीवर स्वीकारलेला पर्याय आहे. जगभरातील अनेक शहरे व संस्था वृक्षलागवडीद्वारे कार्बनचे शोषण करून त्याचा उपयोग कार्बन क्रेडिट्स म्हणून विक्रीसाठी करतात. हे क्रेडिट्स उद्योगसमूह, बहुराष्ट्रीय कंपन्या आणि इतर प्रदूषणकारी घटकांकडून खरेदी केले जातात, जेणेकरून ते आपल्या कार्बन उत्सर्जनाचे संतुलन साधू शकतील. यामुळे संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेला लाखो रुपयांचे वार्षिक उत्पन्न मिळू शकते.

संगमनेर नगर परिषदेकडून या दृष्टीने पुढाकार घेऊन पर्यावरण रक्षणासोबतच शहरासाठी एक शाश्वत उत्पन्नाचा मार्ग खुला होण्यासाठी कार्बन क्रेडिट प्रकल्प तातडीने राबवावा, असे आवाहन नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांना पत्राद्वारे आमदार सत्यजित तांबे यांनी केले आहे.

# शितल भुतडा, नम्रता मुंदडा यांची निवड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** येथील इनरव्हिल क्लब ऑफ़ श्रीरामपूरच्या अध्यक्षपदी आर्किटेक्ट शितल चेतन भुतडा तर सेक्रेटरी पदी इंजीनियर नम्रता संकेत मुंदडा यांची एकमतांनी निवड झाली आहे.

इनरव्हिल क्लबच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत ही निवड करण्यात आली. ही बैठक मावळत्या अध्यक्षा डॉ. शितल अजित घोगरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी उपाध्यक्षपदी राखी बिहाणी, खजिनदारपदी सुरेखा दंड, आय. एस. ओ. पदी ममता गुप्ता, एडिटरपदी शितल कुंदे, सी. एल. सी. सी. पदी सुनिता धुमाळ, सी.पी.सी.सी. पदी सौ. श्वेता शाह, क्लब सी. सी. पदी रमा फोपळे यांची निवड करण्यात आली.

यावेळी मावळत्या अध्यक्षा बरोबर, मावळत्या सेक्रेटरी डॉ. वंदना बोरा, चार्टर्ड प्रेसिडेंट श्रीमती मंगल आढाव या उपस्थित होत्या. नविन पदाधिकाऱ्यांची शपथविधी शुक्रवार दिनांक ११ जुलै रोजी सायंकाळी ५ वाजता हॉटेल अर्चना येथे होणार असल्याचे सांगितले.

कार्यकारणी सदस्य मध्ये वृंदा देशपांडे, डॉ. ज्योतस्ना तांबे, प्रिया अग्रवाल, छाया झंवर, भारती काळे, डॉ. संगिता भिटे, नेहा बुब, सुवर्णा दळवी, स्नेहा बंग यांची निवड करण्यात आली.

## संपादकीय

# ठाकरे बंधू एकत्र आल्याने...

कथित हिंदी सक्तीच्या मुद्यावर उद्धव आणि राज ठाकरे एकत्र आले असले, तरी कारण दोघांच्या राजकीय अस्तित्त्वाचा प्रश्न हे खरे कारण आहे. ते एकत्र आल्याने लगेच राजकारण कूस पालटणार नाही. दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांची पराभूत मानसिकता बदलली, तरी खूप झाले. मराठी मतांच्या एकत्रिकरणाच्या प्रयत्नांमध्ये अन्य मतांचे ध्रुवीकरण होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. हिंदी सक्तीच्या विरोधात उद्धव आणि राज ठाकरे एकत्र आल्याचे सांगितले जात असले, तरी हे तात्कालिक कारण आहे. मागच्या काही वर्षांमध्ये मनसेला कोणत्याही निवडणुकीत फारसे यश मिळत नव्हते, तर शिवसेनेतील फुटीनंतर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला लोकसभेचा अपवाद वगळता सातत्याने पराभवाचा सामना करावा लागला आहे. भाजपला राज्यात शत-प्रतिशत भाजप करायचे आहे. त्यामुळे मित्रपक्षांना किती मदत करायची, याचे काही सूत्र ठरले आहे. भाजप फायदा करून घेतो आणि नंतर वाऱ्यावर सोडतो, असा राज यांचाही समज झालेला असू शकतो. दुसरीकडे, उद्धव यांनी २०१९ च्या विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर ऐन वेळी घेतलेल्या भूमिकेमुळे राज्यात भाजपची सत्ता येऊ शकली नाही. त्यामुळे भाजप उद्धव यांना धडा शिकवण्याची संधी भाजप शोधत होता. मराठी मतदार हा दोन्ही ठाकरेंच्या पक्षाचा पाया आहे. ते विभागले जात असल्याने दोन्ही पक्षांचे राजकीय अवकाश संपत चालले होते. मित्रपक्षांच्या राजकीय अवकाशाची मदत होत नाही आणि स्वतंत्रपणे राजकीय अवकाश व्यापता येत नाही, ही शिवसेना ठाकरे गट आणि मनसेची स्थिती होती. मनसेला तर राजकीय पक्ष म्हणून मान्यता गमावण्याचा धोका आहे. या पार्श्वभूमीवर दोघांनी एकत्र येणे आणि त्यासाठी काही मोठे कारण उभे रहाणे गरजेचे होते. ते हिंदी सक्तीने दिले. मुंबई महापालिकेसह अन्य महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज आणि उद्धव एकत्र आले असले, तरी नेत्यांच्या मनोमिलनानंतर तळागाळातील नेत्या, कार्यकर्त्यांपर्यंत मनोमिलनाचा हा झरा झिरपणार का आणि जागावाटप कसे करणार, यावर या दोन्ही पक्षांचे यश अवलंबून असणार आहे. राज आणि उद्धव एकत्र आल्यामुळे मराठी आणि हिंदुत्ववादी मतदार पुन्हा ठाकरे बंधूंकडे आकर्षित होऊ शकतात. यामुळे विशेषतः मुंबई आणि कोकणात शिंदे गटाची ताकद कमी होऊ शकते. ठाकरे बंधू एकत्र आल्यास भाजपला मराठी मतांचे ध्रुवीकरण रोखण्यासाठी नवी रणनीती आखावी लागेल. यामुळे भाजपची ताकददेखील कमी होऊ शकते. म्हणजेच मनसे आणि ठाकरे गटाची युती झाल्यास मनसेला राजकीय वजन वाढण्याची संधी मिळेल. भाजप नेत्यांचा विश्वास आहे की मराठी विरुद्ध बिगरमराठी मतदारांचे एकत्रीकरण पक्षासाठी फायदेशीर ठरेल. कारण त्यांना गुजराती आणि उत्तर भारतीयांचा पाठिंबा मिळत आहे आणि ही मतपेढी मुंबईत ३० ते ३५ टक्के आहे. राज यांची मनसे आणि उद्धव यांचा ठाकरे गट हे दोघेही पारंपरिक मराठी मतदारांमध्ये प्रभावशाली आहेत. दोघे एकत्र आल्यास ही मराठी मते फुटणार नाहीत, तर एकसंघ राहतील. ही मते भाजपसाठी अडचणीची ठरू शकतात. या दोघांचा प्रभाव विशेषतः मुंबई, ठाणे, नाशिक, पुणे अशा शहरी भागांमध्ये अधिक आहे. या महापालिकांमध्ये मराठी मतदार निर्णायक ठरत असल्यामुळे भाजपला मताधिक्य मिळवण्यात अडथळा येऊ शकतो. भाजपला हे माहीत आहे. मराठी मतांच्या ध्रुवीकरणामुळे अमराठी मतांचे ही ध्रुवीकरण झाल्यास भाजप ही मते आपल्या पदरात पाडून घेईल. गुजराथी, उत्तर भारतीय मतांचे मुंबई, ठाणे आणि पालघर जिल्ह्यातील प्रमाण लक्षात घेतले, तर भाजप आता या मतदारांमध्ये आणखी प्रभाव वाढवण्याची शक्यता आहे. सध्याची राजकीय परिस्थिती पाहता महाराष्ट्रात उद्धव आणि राज यांच्यापेक्षा शिंदे यांच्या शिवसेनेकडे संख्याबळ जास्त आहे. आमदार, खासदारांची संख्या मोठी आहे. त्यातच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षप्रवेश होत आहेत. त्यामुळे तर ठाकरे बंधूंनीही एकीची वज्रमूठ बांधली. काहीही झाले, तरी मुंबई महापालिका भाजपला जाऊ नये, यासाठी उद्धव प्रयत्नशील आहेत. या युतीचा दोन्ही पक्षांना खरोखरच फायदा होईल का, हेही युती झाल्यास एकदा स्पष्ट होईल.

२०१७ मध्ये झालेल्या मुंबई महापालिकेच्या निवडणुकीमध्ये शिवसेनेचे एकूण ९९ नगरसेवक होते. मात्र, शिवसेनेतील फुटीनंतर ठाकरे यांच्या शिवसेनेकडे फक्त ५४ नगरसेवक आहेत. मनसेचे सात नगरसेवक निवडून आले होते. मात्र त्यातील एक नगरसेवक शिंदे यांच्या शिवसेनेत तर सहा नगरसेवक ठाकरे यांच्या शिवसेनेत गेल्याने मनसेकडे एकही नगरसेवक नाही. कल्याण डोंबिवली महापालिकेमध्ये शिवसेनेचे ५७ नगरसेवक निवडून आले होते. शिवसेनेतील फुटीनंतर सद्यस्थितीत उद्धव यांच्या शिवसेनेकडे केवळ नऊ नगरसेवक आहेत तर मनसेचे निवडून आलेले नऊ आणि एक अपक्ष मिळून दहा नगरसेवक आहेत. ठाणे महापालिका महापालिकेच्या २०१७ मध्ये झालेल्या निवडणुकीमध्ये शिवसेनेचे ६७ नगरसेवक निवडून आले होते. शिवसेनेत झालेल्या पक्षफुटीनंतर सद्यस्थितीत ठाकरेंच्या शिवसेनेकडे यापैकी फक्त तीन नगरसेवक आहेत, तर मनसेचा एकही नगरसेवक ठाणे महापालिकेत नाही. नवी मुंबई महापालिकेच्या २०१५ मध्ये झालेल्या निवडणुकीत शिवसेनेचे ३८ नगरसेवक निवडून आले होते. शिवसेनेतील फुटीनंतर ठाकरेंच्या शिवसेनेकडे चार नगरसेवक आहेत, तर मनसेकडे एकही नगरसेवक नाही. या पार्श्वभूमीवर या चारही महापालिकांमध्ये ठाकरेंच्या शिवसेनेला डॅमेज कंट्रोल करत संघटना आणखी मजबूत करून पुन्हा एकदा शिवसेनेची सत्ता आणायची आहे. भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेचे मोठे आव्हान ठाकरे यांच्या शिवसेनेसमोर असणार आहे. त्यामुळे मुंबईसह उपनगरातील प्रमुख महापालिकांवर पुन्हा सत्ता आणायची असल्यास मराठी मतदार एकत्र करण्याची गरज आहे. सद्यस्थितीत मनसेकडे नगरसेवकांचा आकडा बोटांवर मोजण्याइतका असला तरी पक्षाला उभारी देण्यासाठी आणि आपला मतदार टिकवून या महापालिका निवडणुकीत यश मिळवण्यासाठी समविचारी पक्षाला सोबत घेण्याचा विचार या पक्षातर्फे होऊ शकतो. या पार्श्वभूमीवर आता दोन्ही बाजू पक्षविस्तार आणि मनोमिलनावर किती यशस्वी ठरतात, हे पहायचे.

# आणीबाणी तेव्हाची आणि आताची

पन्नाशी अनुभवणाऱ्या २५ जून १९७५ च्या आणीबाणीच्या काळात अनेकांची धरपकड झाली, तुरुंगवास भोगावा लागला. मूलभूत अधिकारांचा संकोच झाला. अर्थात तो अनुभव घेणारे आज देशात अघोषित आणीबाणी आहे, असे म्हणतात. तेव्हा सत्ताधाऱ्यांच्या गुर्मीमुळे आणीबाणी लादावी लागली, तर आता विकासाच्या, संस्कृतीच्या नावाखाली वेगवेगळ्या यंत्रणांच्या आधारे आणीबाणी लागू करण्यात आल्याची टीका होत होत आहे.

पाहता पाहता देशात आणीबाणी लादली गेली, त्याला पन्नास वर्षे पूर्ण झाली. ही देशाच्या राजकीय आणि सामाजिक जीवनातील एक अत्यंत महत्वपूर्ण घटना. आज मागे वळून पाहताना या घटनेचे गंभीर पडसाद उमटलेले दिसतात. इंदिरा गांधींनी लादलेली घोषित आणीबाणी अनुभवणारे बडे नेते, ज्येष्ठ पत्रकार, विचारवंत आजकाल पुन्हा आणीबाणी अवतरल्याचा आरोप करतात. हे नेते काँग्रेसचेच आहेत असे नाही. शिवाय याविषयी काँग्रेसवाले कोणत्या तोंडाने बोलणार? अर्थात, काही इंदिरानिष्ठ नेते आजही आणीबाणीच्या तत्कालिन अपरिहार्यतेचे समर्थन करतात; पण आणीबाणी ही घोडचूकच होती, अशी कबुली देत बहुतांश काँग्रेसजन या लांच्छनातून स्वतःची आणि पक्षाची सुटका करून घेण्यासाठी धडपडतात. 'सर्व ज्येष्ठ नेते तुरुंगवासात असल्यामुळे आपण भूमिगत राहून आणीबाणीविरुद्ध प्रचारसाहित्य बनवले. त्या वेळी गांधीवादी लोकांसोबत काम करण्याची संधी मिळाली,' असे मोदी सांगतात. 'आणीबाणीचे स्मरण करत गळे काढण्याची आपली प्रकृती नाही. आणीबाणीमध्ये आलेल्या संकटांमध्ये भारताची लोकशाही तावून-सुलाखून निघाली. चोहोबाजूंनी अन्याय होत असताना त्याविरुद्ध लढण्याची एक जिद्द असते. ती मूल्यांसाठी जगण्याची ताकद देते. आणीबाणीतून मिळालेला हा सर्वात मोठा धडा आहे,' असे आणीबाणीविषयीचे मोदी यांचे चिंतन असले, तरी भारतीय जनता पक्षाने ज्या पद्धतीने आणीबाणीविरोधात मोहीम उघडून काँग्रेसला पुन्हा आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याची व्यूहनीती आखली आहे का, असा प्रश्न उपस्थित होतो.

**विश्लेषण**
**– नंदकुमार काळे**

मोदी यांनी २०१४ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये इंदिरा गांधीच्या १९७१ च्या निवडणूक प्रचार आणि व्यवस्थापन तंत्राची माहिती घेतली होती. स्वाभाविकच इंदिरा गांधींनी केलेल्या चुका टाळून सर्वसामान्यांवर आणीबाणी न लादता व्यवस्थेवर आपला वरचष्मा प्रस्थापित करण्यावर त्यांचा भर आहे. इंदिरा गांधी यांच्या पावलावर पाऊल टाकणारे मोदी स्वतःच्या प्रतिमेबद्दल कमालीचे जागरुक आणि सतर्क आहेत. इंदिरा गांधींइतकेच ते महत्त्वाकांक्षीही आहेत. जनधारणा प्रतिकूल होणार नाही आणि जनमानसातील प्रतिमा बिघडणार नाही याची काळजी घेत ते राजकीय अडथळे दूर करण्याच्या प्रयत्नात असतात. इंदिरा गांधींच्या आणीबाणीला त्यांचे पुत्र संजय गांधींमुळे दहशतीचे परिमाण लाभले. इंदिरा-संजय गांधींच्या जोडीच्या तुलनेत मोदी-अमित शहा जोडी अधिक चातुर्याने अघोषित आणीबाणी हाताळत आहे. केंद्रात सत्तेत आल्यानंतर सत्तेतून आणखी सत्ता मिळवत त्यांनी पक्षावर आणि देशातील एकूणच सत्ताकारणावर आपली पकड घट्ट केली आहे. इंदिरा गांधींच्या आणीबाणीच्या तुलनेत मोदी यांच्या राजवटीतील अघोषित आणीबाणीला मर्यादा आहेत. कारण जमाना बदलला आहे. इंदिरा गांधींची आणीबाणी भोगणारे पंचवीस टक्के लोकही आज देशात



नसतील. आणीबाणीनंतर दृढ झालेले अभिव्यक्तीस्वातंत्र्य आणि इतर मूलभूत हक्क हिरावून घेणे आता शक्य नाही. आज 'सोशल मीडिया'ला काबूत ठेवणेही अवघड आहे. त्यामुळे उपलब्ध असलेल्या सर्व मार्केटिंग तंत्रानिशी देशात आणि देशाबाहेर आपली प्रतिमा अबाधित राखण्याचे आव्हान मोदींपुढे आहे.

बरोबर ५० वर्षांपूर्वी, २५ जून १९७५ च्या रात्री, भारतीय लोकशाहीवर सर्वात काळा डाग पडला. इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील सरकारने अचानक संपूर्ण देशात आणीबाणी जाहीर केली. या निर्णयानंतर, नागरिकांचे मूलभूत अधिकार हिरावून घेण्यात आले. वर्तमानपत्रांवर सेन्सॉरशिप लादण्यात आली, विरोधकांना तुरुंगात टाकण्यात आले आणि सर्वांचा आवाज दाबण्यात आला.

भारतात यापूर्वी दोनदा आणीबाणी लागू करण्यात आली होती, परंतु त्यामागे युद्ध किंवा बाह्य हल्ला अशी ठोस कारणे होती. २६ ऑक्टोबर १९६२ रोजी चीनशी युद्ध झाल्यानंतर देशात पहिल्यांदाच आणीबाणी लागू करण्यात आली. तेव्हा जवाहरलाल नेहरू पंतप्रधानपदी होते आणि बाह्य धोक्यामुळे ती लागू करण्यात आली. ही आणीबाणी १९६८ पर्यंत चालली. १९७१ ची दुसरी आणीबाणी ३ डिसेंबर १९७१ रोजी पाकिस्तान युद्धामुळे लागू करण्यात आली. हे युद्ध बांगलादेशच्या स्वातंत्र्याशी संबंधित होते आणि देशाच्या सुरक्षेला धोका होता. या वेळी व्ही. व्ही. गिरी राष्ट्रपती होते. १९७५ ची तिसरी आणीबाणी २५ जून १९७५ च्या रात्री इंदिरा गांधी सरकारने अंतर्गत अस्थिरतेचे कारण देत अचानक लागू केली गेली, मात्र खरे कारण न्यायालयाचा निर्णय होता. १२ जून १९७५ रोजी अलाहाबाद उच्च न्यायालयाने इंदिरा गांधींची निवडणूक रद्द केली होती आणि त्यांना सहा वर्षे निवडणूक लढवण्यास मनाई केली होती. त्यानंतर त्यांच्या राजीनाम्यासाठी देशभरात निदर्शने सुरू झाली. इंदिरा गांधी यांनी स्वतःला वाचवण्यासाठी आणि सत्तेत राहण्यासाठी राष्ट्रपती फखरुद्दीन अली अहमद यांना आणीबाणी जाहीर करण्यास भाग पाडले.

ही आणीबाणी पूर्ण २१ महिने म्हणजे २१ मार्च १९७७ पर्यंत चालली. आणीबाणीच्या काळात संविधानाच्या कलम ३५२ अंतर्गत देशातील नागरिकांचे मूलभूत अधिकार रद्द करण्यात आले. वृत्तपत्रांचे स्वातंत्र्य रद्द करण्यात आले. सरकारच्या परवानगीने प्रत्येक बातमी प्रकाशित करण्यात आली. राजकीय विरोधकांना अटक करून तुरुंगात टाकण्यात आले. त्यात जयप्रकाश नारायण, अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी यांसारखी मोठी नावे समाविष्ट होती. १९७५ ची आणीबाणी अजूनही भारतीय लोकशाहीचा सर्वात काळा अध्याय मानली जाते. ती इंदिरा गांधींच्या हुकूमशाही विचारसरणीचे आणि सत्तेच्या भुकेचे प्रतीक मानली जाते. आजही राजकीय पक्ष या निर्णयासाठी काँग्रेस आणि इंदिरा गांधींना कोंडीत पकडतात. हा असा काळ होता, जेव्हा भारतातील लोकशाहीला जबरदस्तीने बंद खोलीत कैद करण्यात आले होते. इंदिरा गांधींनी संवैधानिक तरतुदींच्या मदतीने आणीबाणी लादली; परंतु आणीबाणीच्या काळात जे काही घडले ते आज औपचारिक घोषणा न करता घडत आहे त्याहून वाईट होते. फरक इतकाच आहे, की आणीबाणीच्या काळात केले गेले ते शिस्तीच्या नावाखाली होते, तर आज विकास आणि राष्ट्रवाद हे मंत्र आहेत. आणीबाणीच्या काळात खुशामत आणि राजकीय ढोंगीपणाच्या मर्यादा ओलांडत तत्कालीन काँग्रेस अध्यक्ष देवकांत बरुआ यांनी 'इंदिरा म्हणजे भारत, भारत म्हणजे इंदिरा' असा नारा दिला.

आज भाजपमध्ये रविशंकर प्रसाद, शिवराजसिंह चौहान आणि देवेंद्र फडणवीस यांच्यापासून ते अगदी खालच्या पातळीवरील कार्यकर्त्यांपर्यंत अनेक नेते मोदी यांना दैवी शक्तीचे मूर्त स्वरूप किंवा अलौकिक क्षमता असलेले म्हणून वर्णन करतात. भाजप अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी मोदींना देवांचेही नेते म्हटले, तेव्हा इंदिराजींच्या काळातील राजकीय खुशामतीत आणि सध्याच्या खुशामतीत काहीच फरक नसतो, हे लक्षात आले. आज लोकशाहीची रक्षक म्हणता येतील, अशा संघटना कमी आहेत. अनेक राजकीय पक्ष, प्रशासकीय संस्थाही लोकशाही मूल्यांना वचनबद्ध नाहीत. आज पुन्हा एकदा सरकारी मंत्री न्यायालयांना खटले कसे निकाली काढायचे याबद्दल सल्ला देताना ऐकू येतात. न्यायालयांनीही सरकारच्या हेतूनुसार निर्णय दिले आहेत. सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयाचे न्यायाधीश सार्वजनिक व्यासपीठांवर सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांचे कौतुक करतात; त्यांची विशेष प्रशंसा पंतप्रधान मोदी यांच्यासाठी राखीव असते. एकंदरीत, न्यायव्यवस्था सरकारशी वचनबद्ध झाली आहे. निवडणूक आयोगाची विश्वासार्हता नष्ट झाली आहे. पंतप्रधान आणि त्यांच्या पक्षाच्या सोयी लक्षात घेऊन निवडणुकांचे वेळापत्रक आखले जातात. माहिती अधिकार कायदा जवळजवळ निष्प्रभ झाला आहे. सीबीआय, प्राप्तिकर विभाग आणि अंमलबजावणी संचालनालय यासारख्या संस्था सरकारशी असहमत असलेले विरोधी पक्षनेते, सामाजिक कार्यकर्ते, लेखक आणि बुद्धिजीवींना त्रास देण्यासाठी साधने बनल्या आहेत. या कामातही, न्यायव्यवस्था सरकारला अप्रत्यक्षपणे सहाय्यक म्हणून काम करते.

लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माध्यमांची स्थितीही आज चिंताजनक आहे. आज पत्रकारिता आणीबाणीनंतर होती तशी राहिलेली नाही. याचे मुख्य कारण म्हणजे मोठ्या कॉर्पोरेट घराण्यांचा या क्षेत्रात प्रवेश आणि माध्यम गटांमध्ये असलेली नफा कमावण्याची स्पर्धा. नफेखोरीमुळे माध्यम संस्था पूर्णपणे जनविरोधी आणि सरकारच्या समर्थक बनल्या आहेत. सरकारी आणि बिगरसरकारी माध्यमांमधील फरक जवळजवळ संपला आहे. व्यावसायिक विचारांमुळे माध्यमांची आक्रमकता आणि निष्पक्षता केवळ कमी होत नाही तर व्यावसायिक, नैतिक आणि लोकशाही मूल्ये आणि नागरी हक्कांबद्दलची त्यांची वचनबद्धता देखील कमी होत आहे. परिणामी, देश एका अघोषित आणीबाणीला सामोरा जात आहे. आसपास कोणीच सुखी, समाधानी दिसत नाही. शासन, प्रशासन यापासून त्रस्त दिसत आहे. हे वास्तव समाज मान्य करेल, तो सूदिन...

# संगमनेर हिरवाईने नटलेले वृक्षांचे शहर

## दुर्गाताई तांबे; आषाढी एकादशीनिमित्त संगमनेरात २५२५ झाडांचे रोपण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली विकासातून वैभवशाली ठरलेल्या संगमनेर शहराने स्वच्छ व सुरक्षित शहर म्हणून राज्यात लौकिक मिळवला आहे. नागरिकांना आधुनिक व चांगल्या सुविधा देण्याबरोबर नगरपालिकेने स्वच्छतेत देश पातळीवर अनेक पुरस्कार मिळवले आहेत. माजी नगराध्यक्ष दुर्गाताई तांबे यांच्या वाढदिवस व आषाढी एकादशीच्यानिमित्त शहरात २५२५ वृक्षांची रोपण करण्यात आल्यातून तालुक्यात वृक्ष संवर्धन दिन साजरा करण्यात आला.

संगमनेरमध्ये समता नगर, मार्केट कमिटी, पवार मळा, गंगामाई घाट यांसह विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी डॉ. मैथिली तांबे, महिला काँग्रेस अध्यक्ष प्रमिला अभंग यांच्यासह शहरातील विविध महिला कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

> मागील दहा वर्षांमध्ये संगमनेर शहरांमध्ये विविध वृक्षांचे रोपण करण्यात आले आहे. रस्त्यांच्या दुतर्फा फुल, झाडे याचबरोबर मोकळ्या जागेमध्ये झाडे रोपण करण्यात आले आहे. आज ही झाडे सर्व मोठी झाली असून उन्हाळ्यामध्ये नागरिकांना या झाडांची छान गार सावली मिळत आहे. शहरातील जास्त वृक्षांच्या संख्येमुळे ऑक्सिजनचे चांगले प्रमाण असून थंड हवेचे प्रमाणही वाढले आहे.
>
> **– दुर्गाताई तांबे**



संगमनेर शहराच्या नगराध्यक्ष तांबे यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर नगर परिषदेने स्वच्छता व वृक्षारोपणासाठी राज्य व राष्ट्रीय पातळीवर विविध पुरस्कार व सुमारे १० कोटींचे बक्षिसे मिळवले आहेत. माजी मंत्री बाळासाहेब थोरात व माजी आ. डॉ. सुधीर तांबे यांच्या नेतृत्वाखाली संगमनेरात विकासाच्या अनेक योजना राबविण्यात आले आहेत.

दंडकारण्य अभियानाच्या प्रकल्प प्रमुख असलेल्या सौ. तांबे या अत्यंत साध्या पद्धतीने वाढदिवस करत असून या वाढदिवसानिमित्त यावर्षी शहरात २५२५ वृक्षांचे रोपण करण्यात आले व या वृक्षांच्या संवर्धनाची जबाबदारी स्थानिक कार्यकर्त्यांवर देण्यात आली आहे. वाढदिवसानिमित्त वृक्ष रोपण व संवर्धनाची जबाबदारी कार्यकर्ते घेत असून हा दिवस तालुक्यात वृक्ष संवर्धन दिन म्हणून मोठ्या उत्साहाने साजरा झाला.

# श्रीगोंद्यात मोहरम उत्साहात साजरा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा** : मोहरम पर्वात ताजिया स्थापनेची परंपरा आहे. श्रीगोंदा येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचे आजोबा श्रीमंत मालोजीराजे भोसले यांचे गुरू सुफी संत शेख महंमद बाबा दर्गाह येथे पारंपारीक रुढी परंपरेने चालत आलेल्या ताजिया स्थापनेची परंपरा शेख महंमद बाबा यांच्या वंशजांनी जतन करत कायम ठेवत सालाबादप्रमाणे याही वर्षी महंमद बाबा दर्गाह मध्ये पारंपारिक पद्धतीनुसार ताबुतची स्थापना करण्यात आली होती.



तसेच श्रीगोदा शहरात जावेद फकीर, राजु मनियार, बाळासाहेब गोरे, बादशहा मालजप्ते, महंमद शेख, डॉ. बन्सीभाई मनियार आदिसह श्रीगोंदा तालुक्यात अनेक ठिकाणी ताजिया व सवारी, पंजाची स्थापना करण्यात आली होती.

शेख मोहम्मद बाबा दर्गा ट्रस्टचे अध्यक्ष अमीन शेख, बंडूभाई शेख, अली शेख, अजीज शेख, राजू शेख, चांद शेख, फारूख शेख, सोहेल शेख, तौसीब शेख, रेहान शेख, शाहरुख शेख, शाहिद शेख, फरहान शेख यांच्या हस्ते विधीवत धार्मिक पूजा करून शहरातून वाद्य वाजवत मिरवणुकी काढली आणि विहिरीत ताबुताचे विसर्जन करण्यात आले.

### भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घ्यावा

आज, दि.८ जुलै रोजी (तिजायत) दिवशी शेख महंमद बाबा दरबारात खिचाड्याचा महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या महाप्रसादाचा भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# इंदुबाई मारुती खांदे यांचे निधन



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हार** : भगवतीपुर येथील प्रगतशील शेतकरी खांदे पाटील परिवारातील तसेच येथील जुन्या पिढीतील एक ज्येष्ठ आदरणीय व्यक्तिमत्व इंदुबाई मारुती खांदे(८७) यांचे रविवार दि.६ जुलै २०२५ रोजी वृद्धापकाळाने निधन. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, सुना, जावई आणि नातवंडे असा परिवार असुन त्या दिलीप खांदे व सुनील खांदे यांच्या मातोश्री व कोल्हार भगवतीपुर देवालय ट्रस्टचे माजी विश्वस्त नंदकुमार खांदे यांच्या चुलती आणि नागपूर पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे कार्यकारी परिषद सदस्य ऋषिकेश खांदे यांच्या आजी होत.

पान १ वरून पान १ वरून पान १ वरून

## नव्या पिढीने प्रागतिक विचार जपावा

पाटील आलेले आहेत, आधी उद्धवराव, एनडी पाटील हे लोक आलेले आहेत. हे मी कुटुंबात अनेक वर्षापासून पाहिलेलं आहे आणि या नेतृत्वांचं वैशिष्ट्य होतं की हे सगळे लोक एका विचाराने, एका तत्वाने आपल्या भूमिकेशी आयुष्यभर प्रामाणिक राहिलेले लोक आहेत. सरकार, सत्ता असो वा नसो याचा विचार त्यांनी कधी केलेला नाही आणि आपल्या विचारांची भूमिका स्पष्ट करत त्यांनी आयुष्यभर कष्ट केले. जो कष्टकरी वर्ग आहे त्याच्या हिताची जपणूक त्यांनी केली. आज पुन्हा एकदा चिकाटीने हा विचार पुढे न्यायचा विचार जयंतराव करतात याचा मला मनापासून आनंद आहे.

जयंतराव तुम्ही काम करत रहा. आमच्या सगळ्यांची साथ तुम्हाला कायम मिळेल ही खात्री या ठिकाणी देतो. मला आश्चर्य वाटलं की, जयंतरावांचा ७० वा वाढदिवस आहे. कारण त्यांच्याकडे बघितल्यानंतर ते सत्तरीला पोहोचलेत असं काही वाटत नाही अजूनही त्यांचा उत्साह ३५-४० वर्षाच्या तरुणांइतका आहे. मी पाहतोय तेव्हापासून ते आहे तसेच आहेत. त्यांच्या स्वभावात काही फरक नाही, त्यांच्या संस्था चालवण्यामध्ये काही फरक नाही. कुठलंही काम हातात घेतलं की ते नीट-नेटकंच करायचं ही भूमिका त्यांनी आतापर्यंत जाणीवपूर्वक जतन केलेली आहे.

सर्व बँकांची यादी काढली तर समजेल ९० टक्क्यांच्यावर रिकवरी घेणाऱ्या कोणत्या बँका आहेत तर त्यात रायगड जिल्ह्याचा उल्लेख हा करावा लागतो, सिंधुदुर्गचा करावा लागतो, रत्नागिरीचा करावा लागतो. मी अनेकदा विचार करतो नेमक्या या चार जिल्ह्यातच असं का आहे? याचा अर्थ कोकणी माणसाच्या स्वभावात दिसतो असं मला वाटतं. घेतलेलं कर्ज लवकरात लवकर फेडणे याशिवाय गत्यंतर नाही. हा विचार कोकणी माणसाच्या अंतकरणात रुजलेला आहे.

## विधानसभेत कर्जत-जामखेडचा आवाज घुमला

केली. नैसर्गिक आपत्तीमध्ये पडलेल्या विजेच्या खांबांमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असून, अशा खांबांना पुन्हा उभे करण्यासाठी सुसंगत व स्पष्ट नियमावली तयार करावी, अशी मागणीही आ. पवार यांनी सभागृहात केली.

एकूणच कर्जत-जामखेडच्या स्थानिक प्रश्नांपासून ते राज्याच्या व्यापक मुद्द्यांपर्यंत रोहित पवार यांनी ज्या मुद्द्यांवर सरकारचे लक्ष वेधले, ते मतदारसंघाच्या विकासासाठी आणि सामान्य जनतेच्या हितासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## कोपरगाव बाजारपेठेची आर्थिक उलाढाल वाढविण्यात यश

भगिनींची होणारी वणवण कायमची थांबली आहे.

मागील वर्षी पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत कोपरगाव मतदारसंघासह शहरातील मतदारांनी मला सव्वा लाखाच्या मताधिक्याने निवडून देऊन माझी जबाबदारी अधिक वाढवली याची मला जाणीव आहे. विकासकामांसाठी पाहिजे तेवढा निधी देतो परंतु एका विकास कामासाठी मिळणारा निधी हा वारंवार मिळत नाही. त्यामुळे मिळालेल्या निधीतून चांगल्या दर्जाची कामे होणे अपेक्षित असून ती कामे दीर्घकाळ टिकली पाहिजे व नागरीकांना देखील त्याचा उपभोग दीर्घकाळ घेता आला पाहिजे. यासाठी कोपरगाव नगरपरिषद प्रशासनाने योग्य काळजी घ्यावी अशा सूचना आ.आशुतोष काळे यांनी यावेळी केल्या.

## भक्ती अन् पर्यावरण संवर्धनाचा संगम

पंढरपूरला पायी दिंडीतून विठुरायाच्या दर्शनासाठी जात असताना, कोपरगावमध्येही एकादशीचे औचित्य साधून सामाजिक भान जपत भक्तिभावाने हा पवित्र दिवस साजरा करण्यात आला. याचे सर्वांनी कौतुक केले.

याप्रसंगी विद्या सोनवणे, शिल्पा रोहमारे, अनिता गाडे, दीपा गिरमे, सुवर्ण सोनवणे, योगिता आढाव, वैशाली आढाव, अच्युता बागुल, दिपाली आघाडे, वैभव आढाव, राजेंद्र सोनवणे, रवींद्र पाठक, नारायण शेठ अग्रवाल, नसीरभाई सय्यद, दिलीपराव मंजुळ, विवेक सोनवणे, प्रशांत कडू, कैलास खैरे, विनोद नाईकवाडे, जयप्रकाश आव्हाड, सचिन सावंत, सोमनाथ म्हस्के, गोपीनाथ गायकवाड, अकबरलाला शेख, रवींद्र लचुरे, चंद्रकांत वाघमारे, सुशांत खैरे, विजय चव्हाणके, रामदास साळुंखे, हुसेनभाई सय्यद, फकीर पैलवान, संजय खरोटे यांसह आदी उपस्थित होते.

# गोदावरी नदी दुथडी भरून वाहू लागली



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : कोपरगाव शहरा जवळून जाणारी गोदावरी नदी सध्या दुथडी भरून वाहू लागली आहे. सध्या हे पाणी लहान पुलाला टच होण्यासाठी दोन ते अडीच फूट दुपारी दोन वाजेपर्यंत तरी खाली होते.

वरुणराजाने नाशिक भागामध्ये कृपादृष्टी केल्यामुळे मागील दोन दिवसांपासून पावसाने जोर धरला असल्यामुळे त्या भागातील नदी नाले ओढे पूर्ण क्षमतेने वाहू लागल्याने गोदावरी नदीची जलपातळी मध्ये नांदूर मधमेश्वर धरणातून ४३,८८२ क्यूसेस पाण्याचा विसर्ग करण्यात आला असून गोदावरी नदी काठावरील नागरिकांनी सतर्क रहावे तसेच रात्री ८ वाजेपर्यंत पाणी पातळीत अधिकची वाढ होण्याची दाट शक्यता आहे.

तेव्हा नदीकाठच्या नागरिकांनी सतर्क रहावे तसेच आपली जनावरे नदीकाठी जाणार नाहीत, याची काळजी घ्यावी तसेच गोदावरीचे पाणी पाहण्यासाठी नदी किनारी जाणे टाळावे, असे आवाहन कोपरगावचे तहसीलदार महेश सावंत तसेच नायबतहसीलदार कुलथे यांनी कोपरगावकर नागरिकांना केले आहे.

# निळवंडे धरणातून १० हजार क्युसेकने विसर्ग सुरु

## नदीकाठच्या गावांना प्रशासनाकडून सतर्कतेचा इशारा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले** : निळवंडे (उर्ध्व प्रवरा) धरणातून आज सोमवार दि. ७ जुलै रोजी सकाळी ९ वाजता १० हजार क्युसेक पाण्याचा विसर्ग प्रवरा नदीपात्रात सोडण्यात आला आहे. पावसाचे प्रमाण लक्षात घेता पुढील काही तासांत विसर्ग टप्याटप्याने वाढण्याची शक्यता असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

धरणातून सोडण्यात येणाऱ्या पाण्यामुळे प्रवरा नदीपात्रात पाणीपातळी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे नदीकाठच्या अकोले, संगमनेर, ओझर बंधाऱ्याखालील गावांसह राहाता, राहुरी, श्रीरामपूर आणि नेवासा तालुक्यातील सर्व नदीकाठच्या गावांना व वस्त्यांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. नदीपात्रात ठेवलेले जनावरं व तत्सम साहित्य तात्काळ सुरक्षित ठिकाणी हलविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

नागरिकांनी सतर्क राहावे, नदीपात्रात उतरणे अथवा उशिरा हालचाल टाळावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. तसेच संबंधित तालुक्यांतील प्रशासकीय यंत्रणांनी योग्य ती खबरदारी घेण्याचे निर्देश देण्यात आले असल्याचे कार्यकारी अभियंता प्रदीप हापसे (उर्ध्व प्रवरा धरण विभाग, संगमनेर) यांनी सांगितले.

पावसाच्या परिस्थितीवर लक्ष ठेवून धरणातील विसर्गात बदल होऊ शकतो, त्यामुळे नागरिकांनी प्रशासनाशी संपर्कात राहून दक्षता बाळगावी, असेही आवाहन करण्यात आले आहे.



### नागरिकांनी दक्षता बाळगावी: खताळ

निळवंडे धरणातून सोमवारी दुपारी १० हजार क्यूसेक्सने प्रवरा नदी पात्रा मध्ये पाणी सोडले आहे. त्यामुळे नदी काठच्या सर्व नागरिकांना जलसंपदा विभागामे सावधानतेचा इशारा दिला आहे. त्यामुळे नदीकाठच्या लोकांनी नदी पात्रामध्ये न जाता सावधानता बाळगावी, असे आवाहन आ. अमोल खताळ यांनी केले आहे. भंडारदरा पाणलोट क्षेत्रात सध्या मुसळधार पाऊस सुरू आहे भंडारदरा धरणातून निळवंडे धरणात मोठ्या प्रमाणात पाणी सोडण्यात आले आहे.पावसाचे वाढते प्रमाण लक्षात घेता धरणाचा विसर्ग टप्प्याटप्प्याने वाढ विण्यात येत आहे.

### नदीकाठच्या गावांनी काळजी घ्यावी: थोरात

भंडारदरा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पावसाची संततधार सुरू असल्याने धरणाच्या क्षेत्रात पाण्याची आवक वाढली आहे त्यामुळे निळवंडे धरणातून १० हजार क्यूसेस पाणी सोडण्यात आली असून आगामी काळात पावसाच्या पाण्यात वाढ होण्याची शक्यता आहे म्हणून नदीकाठच्या गावांनी व नागरिकांनी अधिक सतर्क राहावे असे आवाहन युवा काँग्रेसचे अध्यक्षा डॉ. जयश्रीताई थोरात यांनी केले आहे. काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या यशोधन कार्यालयातून नदीकाठच्या नागरिकांना मदतीसाठी सूचना देण्यात आल्या आहेत.



# कचरा डेपोच्या आगीमुळेनागरिकांचे आरोग्य धोक्यात

**जनता आवाज वृत्तसेवा**



**संगमनेर** : संगमनेर खुर्द परिसरातील कचरा डेपोला आग लागली होती.त्यामुळे वाढते वायु प्रदुषण आटोक्यात आणण्यासाठी व स्थानिक नागरिकांचे आरोग्य धोक्यात येऊ नये. यासाठी नगरविकासामार्फत काय प्रतिबंधात्मक उपाय योजना केली. यावर आमदार अमोल खताळ यांनी विधानसभेत तारांकित प्रश्न उपस्थित करत विधानसभेचे लक्ष वेधले.

### आ. खताळ यांनी विधानसभेमध्ये उपस्थित केला प्रश्न

मुंबई येथे विधानसभेचे पावसाळी अधिवेशन सुरू आहे. या अधिवेशनाचा दुसऱ्या आठवड्यातील पहिल्या दिवसातील तारांकित प्रश्न मांडताना आ. अमोल खताळ म्हणाले की, संगमनेर शहरातील गोळा होणारा सर्व कचरा घंटागाड्यांतून संगमनेर खुर्द येथील कचरा डेपोवरती टाकला जातो. त्यावर शास्त्रसोक्त पद्धतीने प्रक्रिया सुद्धा केली जात नाही. या कडे नगरपालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. त्यातच मार्च महिन्यामध्ये या कचरा डेपोला भीषण आग लागून वायु प्रदूषणात वाढ होऊन या परिसरातील नागरीकांना श्वास घेणे त्रासदायक झाले असल्याचे निदर्शनास आले होते.

आमदार खताळ यांच्या प्रश्नाला उत्तर देताना राज्याचे नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, संगमनेर खुर्द येथील कचरा डेपोला आग लागली होती. या कचरा डेपोतील आगीमुळे निर्माण होणाऱ्या धुराने परिसरामध्ये राहणाऱ्या नागरिकांना श्वसनासंबंधी त्रास होत असल्याबाबतच्या तक्रारी नगरपरिषदेस प्राप्त झाल्या नसल्याचे मंत्री एकनाथ शिंदे यांनी आमदार खताळ यांच्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

# कोपरगावात ख्रिश्चन समाजाचा मोर्चा

## गोपीचंद पडळकर यांच्या वक्तव्याचा केला निषेध

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव शहर** : ख्रिश्चन समाजाच्या धर्मगुरुं विरोधात चिथावणीखोर वक्तव्यकरणारे आमदार गोपीचंद पडळकर यांच्यावर गुन्हा दाखल करावा व त्यांची आमदारकी रद्द करावी, या मागणीसाठी सोमवारी सकाळी ख्रिश्चन समाज बांधवांनी शांततेच्या मार्गाने काळ्या फीत लावून पोलीस स्टेशन जवळील चर्च येथून मेन रोड गुरुद्वारा मार्गाने तहसील कार्यालयावर जावून तहसीलदारांना निवेदन दिले.

निवेदनात म्हटले आहे की, पडळकर यांनी ख्रिश्चन धर्म गुरूंविषयी आक्षेपार्य वक्तव्य केले तसेच ख्रिश्चन धर्मगुरूंना मारण्यासाठी ११ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले. खऱ्या अर्थाने हा प्रकार संविधानावर आघात करणार आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील सर्व ख्रिस्ती धर्मगुरू यांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. तेव्हा आमदार गोपीचंद पडळकर यांच्यावर गुन्हा नोंदवून त्यांचे आमदाराचे सदस्यत्व रद्द करावे तसेच ख्रिस्ती धर्मगुरूंना संरक्षण मिळावे. ख्रिस्ती धर्मगुरूंचा आमदार गोपीचंद पडळकर यांच्या या वक्तव्यामुळे ख्रिस्ती धर्मगुरूंचा घात झाल्यास त्यास महाराष्ट्र शासन जबाबदार राहील.



यावेळी फादर विशाल त्रिभुवन फादर संजय पठारे फादर अनिल पटेकर फादर अजय भोसले फादर जोमे, सिस्टर मेरी कारवारो सिस्टर स्मिता, सिस्टर लुविझा यांच्यासह कोपरगाव तालुका ख्रिस्ती समाज संघटनेचे अध्यक्ष राजन त्रिभुवन, उपाध्यक्ष फ्रेंडी फर्नांडिस, सचिव रवी सोनवणे, अजित कसाब आदींसह कोपरगाव शहरासह परिसरातील ख्रिश्चन बांधव यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दोन विद्यार्थ्यांची औषध निर्माण कंपनीमध्ये निवड



**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील प्रवरा कृषि शास्त्र संस्था अंतर्गत असणाऱ्या कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थी प्रशांत ठाकरे आणि शुभम बडाख यांची छत्रपती संभाजीनगर येथील वोखार्ड लिमिटेड या औषध निर्माण कंपनीमध्ये निवड झाली असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. निलेश दळे यांनी दिली. महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी प्रवरा कृषि शास्त्र संस्था विविध उपक्रम राबवत असते. त्यामध्ये व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा, मान्यवर व्यक्तींची मार्गदर्शन व्याख्याने, जैवतंत्रज्ञान आधारित औद्योगिक कंपन्यांमध्ये प्रशिक्षण व भेटी, माजी विद्यार्थी संवाद, शिवार फेरी इत्यादी उपक्रमांचा समावेश होतो. कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाची भूमिका केवळ शिक्षणापुरती मर्यादित नसून, आधुनिक कृषी व जैवतंत्रज्ञानाच्या क्षेत्रात संशोधन, उद्योजकता विकास व रोजगार निर्मितीत मोठा वाटा आहे. कृषी जैवतंत्रज्ञानाचा वापर करून बियाणे उत्पादन, जैविक खते, सूक्ष्मजीवजन्य औषधनिर्मिती, वनस्पती ऊती संवर्धन, अन्न प्रक्रिया, औषधनिर्मिती, आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञान विकासात विद्यार्थी करिअर घडवू शकतात. निवड झालेल्या या विद्यार्थ्यांना कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. निलेश दळे, प्रा. भाऊसाहेब घोरपडे, प्रा. दिपके यांचेचे मार्गदर्शन लाभले आहे.

# बालगोकुलम अकॅडमीच्या विद्यार्थ्यांची आषाढीनिमित्त दिंडी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हार** : आषाढी एकादशीनिमित्त बालगोकुलम अकॅडमी कोल्हार बुद्रुक या शाळेतील बालगोपालांनी दरवर्षीप्रमाणे श्रीहरी पांडुरंग, रुक्मिणी, वारकरीयांचा पेहराव करून टाळ मृदुंगाच्या गजरात विठुनामाचा जयघोष करत बालगोकुलम शाळा ते भगवती माता मंदिर या मार्गावर पायी दिंडी पांडुरंगाचा नामस्मरण करत काढली.



कोल्हार बुद्रुकचे माजी सरपंच सुरेंद्र खर्डे पाटील व भगवतीपुरचे माजी सरपंच रावसाहेब खर्डे पाटील, शिवधन फाऊंडेशनचे अध्यक्ष व जनता आवाजचे संपादक अजित मोरे, बालगोकुलम अकॅडमीचे संस्थापक प्रा. सोन्याबापू मोरे, प्राचार्य शारदा मोरे व इतर पालक प्रतिनिधी यांच्या हस्ते पांडुरंग रुक्मिणी रूपातील बालगोपालचे हार घालून स्वागत करण्यात येऊन, श्री विठ्ठलाची आरती मान्यवरांचे हस्ते करण्यात आली. दिंडीच्या स्वागतासाठी आलेल्या मान्यवरांनी बालगोपालांचे दिंडीचे स्वागत व कौतुक करून आषाढी एकादशी निम्मित उपस्थित सर्वाना हार्दिक शुभेच्छा दिल्या.''विठ्ठलनाम घेऊ या, शिक्षणात प्रगती करू या!'' ,''नामस्मरणाची सवय लावू, संस्कारांची शिदोरी बांधू!'' ''शिकून होऊ या ज्ञानी, आणि विठ्ठलाचे भक्त सजग व स्वाभिमानी!'' ''पंढरीचा वास, विद्यार्थ्यांमध्ये भक्तीचा ध्यास'' विद्यार्थ्यांनी मंदिरासमोर प्रांगणात रिंगण सोहळा घेऊन उपस्थितांना दाखवून दिला. रिंगण सोहळा पाहण्यासाठी व आपल्या बालगोपालांचे कौतुक करून संस्काराची शिदोरी देण्यासाठी बहुसंख्येने पालकवर्ग व नागरिक उपस्थित होते.

# कवाद पतसंस्थेचे काम आदर्शवत : जाधव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : पारनेर तालुक्यातील सहकारी पतसंस्था क्षेत्रात बाबासाहेब कवाद निघोज पतसंस्था नेहमी आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, कार्यात प्राधान्याने सहभागी होऊन आदर्श असे कामकाज करीत आहे, असे गौरवोद्गार सहकारी संस्थेचे सहाय्यक निबंधक विकास जाधव, जाधव यांनी काढले.

केंद्रीय सहकारमंत्रालयाच्या वतीने सहकार स्थापना सप्ताहानिमित्त महाराष्ट्र राज्याच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या 'एक पेड, माँ के नाम' या उपक्रमा निमित्त पारनेर तालुका सहकारी संस्थांचे सहाय्यक निबधंक व बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमानाने निघोजच्या पठारवाडी येथील न्यु इंग्लिश मेडीअम स्कुल येथे झाडांचे वृक्षारोपणप्रसंगी जाधव बोलत होते. यावेळी बाबासाहेब कवाद पतसंस्थेचे चेअरमन वसंतराव कवाद, पारनेर तालुका पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष शिवाजी आप्पा मोरे उपस्थित होते.



कार्यक्रमास सहकार अधिकारी श्रेणी- १ चे राजेंद्र बी. वाघमोडे, प्रमाणित लेखा परिक्षक सतीष मुळे, संस्थेचे व्हाईस चेअरमन नामदेव थोरात, संचालक बाळासाहेब लामखडे, दामु लंके, भिवाजी रसाळ, बाबाजी कळसकर, सतीश साळवे, मुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय लंके, निघोज सोसायटीचे चेअरमन सुनिल वराळ व्हाईस चेअरमन संतोष लामखडे, संचालक दिलीप कवाद, संपदा पतसंस्थेचे चेअरमन शिवाजीराव वराळ, प्राचार्य डायस आदी उपस्थित होते.

# गोकुळचंद विद्यालयाचा दिंडी सोहळा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव शहर** : कोपरगाव शहरातील श्रीमान गोकुळचंद विद्यालयात आषाढी एकादशी निमित्त विद्यार्थ्यांनी संतांची व वारकऱ्यांच्या वेशभूषा करून विद्यार्थी यामध्ये मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या चिमुकल्यांची वारकरी दिंडी सर्वांचं लक्ष वेधून घेत होती. यात बाल दिंडीने टाळ मृदुंगाच्या साथीने ज्ञानोबा माऊली तुकारामांच्या नामघोष करत भक्तीत तल्लीन होऊन या चिमुकल्यांनी रिंगण सादर केले या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उमाताई वहाडणे तसेच कोपरगाव एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष कैलास ठोळे, सचिव दिलीप अजमेरे, सहसचिव सचिन अजमेरे तसेच स्थानिक स्कुल कमेटीचे चेअरमन चंद्रकांत ठोळे,डॉ.अमोल अजमेरे, आनंद ठोळे, राजेश ठोळे, संदीप अजमेरे आदि मान्यवरांनी या विद्यार्थ्यांना आषाढी एकादशी निमित्त शुभेच्छा दिल्या.शाळेचे मुख्याध्यापक रघुनाथ लकारे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. याप्रसंगी उपमुख्याध्यापक अनिल अमृतकर, पर्यवेक्षक बलभीम उल्हारे, दिलीप तुपसैंदर, आदीसह शिक्षक, शिक्षिका कर्मचारी वृंद तसेच शाळेचे विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी विद्यालयाचे कलाशिक्षक अतुल कोताडे, योगेश गवळे, डोळे यांनी विद्यार्थींना मार्गदर्शन केले.

# भाजपाची राहाता जम्बो कार्यकारिणी जाहीर : डॉ.स्वाधीन गाडेकर

**जनता आवाज वृत्तळसेवा**

**राहाता** : महाराष्ट्र राज्याचे जलसंपदामंत्री तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील व डॉ. सुजयदादा विखे पाटील यांच्या सूचनेनुसार व मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पार्टीचे राहाता मंडल अध्यक्ष डॉ. स्वाधीन गाडेकर यांनी राहाता मंडलची जम्बो कार्यकारिणी जाहीर केली आहे. आगामी काळात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था आणि ग्रामपंचायत निवडणुका डोळ्यासमोर ठेवून भारतीय जनता पार्टी राहाता मंडलाची जम्बो कार्यकारिणी मंडल आहे. या कार्यकारिणी मध्ये २ सरचिटणीस, ६ उपाध्यक्ष, ६ चिटणीस, १ कोषाध्यक्ष, १५ कार्यकारणी सदस्य, ७ मोर्चाचे मंडल अध्यक्ष, २६ प्रकोष्ठचे संयोजक आदी मिळून ६३ सदस्यांची जम्बो कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे

यामध्ये सरचिटणीसपदी सचिन भैरवकर, किरण चोळके, उपाध्यक्षपदी संतोष सदाफळ, अंकुश भडांगे, सौ. कालिंदी भवर, ज्ञानेश्वर तुरकणे, गोवर्धन सरोदे, किरण सालपुरे, चिटणीसपदी रवींद्र आगलावे, चेतन गाडेकर बाळासाहेब सापते, भाऊसाहेब भांबरे, रवींद्र गुंजाळ, पंकज गोर्डे आणि कोषाध्यक्ष म्हणून पंकज कुलकर्णी आदींची निवड करण्यात आली आहे. युवा मोर्चा अध्यक्ष – सागर कापसे, महिला मोर्चा अध्यक्षा – शोभाताई घोरपडे, किसान मोर्चा अध्यक्ष –विनायकराव जपे, ओबीसी मोर्चा अध्यक्ष – शरद गायकवाड, अनु.जाती मोर्चा – जॉन त्रिभुवन, अनु. जमाती मोर्चा – पुनीत बर्डे, अल्पसंख्यांक मोर्चा – आरिफ तांबोळी यांची निवड झाली आहे.

उद्योग आघाडीमध्ये – प्रवीण देवकर, व्यापार आघाडी – प्रवीण वाकचौरे, भटके विमुक्त आघाडी – चेतन रणमाळे, वैद्यकीय आघाडी – डॉ. अमोल बेंद्रे, कायदा आघाडी – अतुलकुमार मालवदे, सहकार आघाडी – राजेश सदाफळ, ट्रान्सपोर्ट आघाडी – सागर घोगळ, सोशल मीडिया सेल – गणेश आरणे, माजी सैनिक सेल – रंजयकुमार सुलाखे, जेष्ठ कार्यकर्ता सेल – अशोकराव जमधडे, दिव्यांग सेल – सचिन पोटे, आध्यात्मिक आघाडी – विकास महाराज यादव, पदवीधर प्रकोष्ठ – नवनाथ शिरोळे आदींची नियुक्ती जाहीर झाली आहे. तसेच कार्यकारिणी सदस्य म्हणून बालमभाई सय्यद, मनीषा चांगले, उत्तम हेंगडे, अजय रोहोम, दिपाली कान्होरे, भाऊसाहेब काळे, जयश्री वाणी, श्रुती चौधरी, वाल्मिक मोरे, विलास गोल्हार, प्रतिभा साळुंखे सागर कातोरे, अनिल डांगे हर्षल सातव, दर्शन गाढवे आदीची निवड करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण पद्मश्री विखे पाटील कारखान्याचे चेअरमन मा.खा.डॉ. सुजयदादा विखे पाटील,प्रदेश सरचिटणीस विजुभाऊ चौधरी, संघटन मंत्री रवीजी अनासपुरे, जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, माजी जिल्हाध्यक्ष राजेंद्र गोंदकर, माजी जिल्हासरचिटणीस नितीन कापसे, मंडल अध्यक्ष डॉ. स्वाधीन गाडेकर आदींनी नूतन पदाधिकारी यांचे अभिनंदन करुन त्यांना भावी कार्यासाठी व वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# धार्मिक स्थळांच्या विकासातून संस्कृतीचे संवर्धन

## आ. आशुतोष काळे; माहेगाव देशमुख येथील श्री अमृतेश्वर मंदिर परिसरात विकास कामांचा शुभारंभ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी** : धार्मिक स्थळे श्रद्धा व एकतेचे प्रतीक असून धार्मिक स्थळांचा विकास म्हणजे केवळ सौंदर्यवाढ नसून हा विकास सामाजिक ऐक्य, परंपरा समृद्ध संस्कृतीच्या संवर्धनाचा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. धार्मिक स्थळे व तीर्थक्षेत्रांचा विकास समाज मनाच्या जडणघडणीसाठी अत्यंत आवश्यक असून धार्मिक स्थळांच्या विकासातून संस्कृतीचे संवर्धन होत असल्याचे प्रतिपादन आ. आशुतोष काळे यांनी केले.

आषाढी एकादशीचा मुहूर्त साधत राज्य शासनाच्या पर्यटन विभागाच्या तिर्थक्षेत्र व पर्यटन विकास अंतर्गत माहेगाव देशमुख येथील श्री अमृतेश्वर महादेव मंदिर परिसरातील सभामंडप व सुशोभीकरण कामाचा शुभारंभ आ. काळे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी ते बोलत होते.

आ. काळे म्हणाले की, श्री अमृतेश्वर महादेव मंदिर हे केवळ श्रद्धेचे स्थळ नाही, तर गावातील विविध सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांचे केंद्रस्थान आहे. महाशिवरात्र व श्रावण महिन्यात भाविकांची श्री अमृतेश्वराचे दर्शनासाठी मोठी गर्दी होत असते. तसेच एकादशीला दुसऱ्या दिवशी होत असलेला प्रदोष कार्यक्रम



यासाठी देखील मोठ्या संख्येने भाविक येतात. त्या भाविकांना सर्व प्रकारच्या सोयी सुविधा मिळाव्यात या दृष्टीकोनातून केलेल्या पाठपुराव्यामुळे श्री अमृतेश्वर महादेव मंदिर परिसरातील सभामंडप व सुशोभीकरण कामासाठी ५० लक्ष निधी मिळविला आहे.

> मे आणि जून महिन्यात पडलेल्या पावसाने शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत होवून चालू वर्षी भरघोस उत्पन्न मिळेल या आशेपोटी शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात खरीप पिकांच्या पेरण्या केलेल्या आहेत. आज रोजी खरीप पिकांना पावसाची अत्यंत आवश्यकता असतांना मात्र जवळपास तीन आठवड्यापासून कोपरगाव मतदारसंघावर पाऊस रुसला आहे. पंढरीच्या पांडुरंगा वरुणराजाला पुन्हा कोपरगाव मतदार संघावर कृपा करण्यास सांगावी व माझ्या बळीराजाला सुखी करावे.
>
> **– आशुतोष काळे, आमदार**

शिव भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री अमृतेश्वर महादेव मंदिराचा सर्वांगीण विकास हा गावाच्या सर्वांगीण प्रगतीस हातभार लावणार असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी माहेगाव देशमुख गावचे सुपुत्र, भारतीय सैन्याच्या पॅराशूट रेजिमेंटमध्ये २८ वर्षे देशसेवा करून ऑ. लेफ्टनंट पदावरून नुकतेच सेवानिवृत्त झालेले वाल्मिक शिवराम पानगव्हाणे यांचा आ. आशुतोष काळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी श्री अमृतेश्वर देवस्थान ट्रस्ट, श्री दत्त दिगंबर देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त, सरपंच, उपसरपंच व सदस्य, माहेगाव देशमुख विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे चेअरमन, व्हा. चेअरमन, संचालक मंडळ व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पैस खांबाच्या दर्शनासाठी भाविकांची मांदियाळी

## नेवाशात आषाढी एकादशी उत्साहात; संत मंदिर परिसर भक्तिभावाने फुलला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या पवित्र कर्मभूमी नेवास्यात आषाढी शुद्ध एकादशीनिमित्त मोठ्या वेळी ज्ञानेश्वरी पारायणासाठी नाशिकहून आलेल्या वारकरी भाविकांच्या हस्ते पैस खांबास पंचामृत, चंदन, उटी अर्पण करून वेद मंत्रांच्या गजरात

### टाळ–मृदंगाच्या गजरात रिंगण सादर

संत ज्ञानेश्वर मंदिर परिसरात करविनी निवासिनी ग्रुपच्या महिला भाविकांनी टाळ–मृदंगाच्या निनादात ज्ञानोबा माऊली तुकारामच्या गजरात रिंगण सादर केले. या भक्तिरसपूर्ण सोहळ्यात महिलांचा सहभाग विशेष लक्षवेधी ठरला. त्यांनी संपूर्ण परिसर भक्तिभावाने भरून टाकला.

भक्तिभावात आणि उत्साही वातावरणात पैस खांबाचे दर्शन घेण्यासाठी हजारो भाविकांनी गर्दी केली. पहाटेपासूनच मंदिर परिसर व गावात विठ्ठलनामाच्या गजरांनी वातावरण दुमदुमून गेले होते.

या दिवशी पहाटेच्या अभिषेक करण्यात आला. हा पारंपरिक आणि भक्तिभावपूर्ण सोहळा उपस्थित भाविकांना आध्यात्मिक समाधान देणारा ठरला.

दर्शनासाठी भाविकांची पहाटेपासूनच मोठी रांग लागली होती. या गर्दीचे सुयोग्य



व्यवस्थापन करण्यासाठी सेवेकरी गोरख भराट यांच्यासह हभप बन्सी महाराज तांबे वारकरी शिक्षण संस्थेचे विद्यार्थी स्वयंसेवक म्हणून सेवेत कार्यरत होते. त्यांनी दर्शन रांगा, पाणी, मंदिर, श्री मोहिनीराज मंदिर यासारख्या अन्य देवस्थानांमध्येही भाविकांनी दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी केली.

### संपूर्ण नेवासा वारीचा अनुभव देणारा ठरला

पंचक्रोशीतील विविध गावांमधून आलेल्या दिंड्यांनी नेवासात हजेरी लावली. वारकऱ्यांनी वारी परंपरेनुसार टाळ, मृदंग आणि हरिपाठाच्या माध्यमातून आपल्या श्रद्धेची अभिव्यक्ती केली. त्यामुळे संपूर्ण नेवासा परिसर एकदिवसीय वारीचा अनुभव देणारा ठरला.

माहिती यासाठी विशेष सहकार्य केले.

मंदिर परिसरात विविध प्रकारची पूजावस्तू, खाद्यपदार्थ व खेळण्यांची दुकाने थाटण्यात आली होती. यात्रेसारखे वातावरण तयार झाले होते. नेवासा शहरातील संत तुकाराम महाराज मंदिर, विठ्ठल–रुक्मिणी

पर्वानिमित्ताने नेवासा येथील वकिल मंडळींनी देखील ज्ञानोबा माऊली तुकारामच्या जयघोषात सुसज्ज दिंडी काढली. ही दिंडी संत ज्ञानेश्वर मंदिरापर्यंत नेण्यात आली. नगरमध्ये प्रवेश करताच भाविकांनी तिचे जल्लोषात स्वागत केले.

# प्रवरेच्या विद्यार्थ्यांची बँकेमध्ये निवड



**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील प्रवरा कृषि शास्त्र संस्था अंतर्गत असणाऱ्या कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयातील माजी विद्यार्थी अक्षय म्हस्के याची आयसीआयसीआय बँकेत सहायक व्यवस्थापक आणि गौरव हजारे याची भारतीय स्टेट बँकेत लिपिक या पदावर निवड झाली असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आशिष क्षीरसागर यांनी दिली.

महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी प्रवरा कृषि शास्त्र संस्था विविध उपक्रम राबवत असते. त्यामध्ये व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा, मान्यवर व्यक्ती मार्गदर्शन व्याख्याने, कृषी आधारित औद्योगिक कंपनी प्रशिक्षण व भेटी, माजी विद्यार्थी संवाद, शिवार फेरी इत्यादी उपक्रमांचा समावेश होतो.

माजी विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, डॉ. सुजय विखे पाटील, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. डॉ. सुस्मिता विखे पाटील, संस्थेचे अतिरिक्त मुख्य कार्यकरी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ, सहसचिव भारत घोगरे, प्रवरा कृषी शास्त्र संस्थेचे संचालक डॉ. उत्तमराव कदम, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. आशिष क्षीरसागर आदींनी अभिनंदन केले.

# खोटे सोने तारण ठेवून लाटले लाखोंचे कर्ज?

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वैजापूर** : छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर येथील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या मोढा मार्केट शाखेत खोट्या सोन्याच्या तारणावर कर्ज घेण्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणात बँकेला तब्बल १२ लाख १५ हजार रुपयांचा आर्थिक फटका बसला आहे. बँकेच्या शाखा व्यवस्थापकांनी याबाबत वैजापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, दोन ग्राहक आणि बँकेच्या पॅनलवरील सोनारावर कायदेशीर कारवाईची मागणी केली आहे.

नवनीत नारायण शर्मा (वय ४७) हे स्टेट बँक ऑफ इंडियाच्या वैजापूर शाखेत गेल्या एक वर्षापासून शाखा व्यवस्थापक



उपव्यवस्थापक दिपांजली जेधे आणि सर्व्हिस मॅनेजर राजीव लक्ष्मण सपकाळ यांची नियुक्ती आहे. गोल्ड लोनसाठी तारण ठेवलेले सोने लॉकरमध्ये ठेवणे आणि कर्जमुक्तीनंतर ग्राहकांना सोने परत करणे यासारख्या जबाबदाऱ्या या दोघांकडे आहेत.

याशिवाय छत्रपती संभाजीनगर येथील स्टेट बँकेच्या प्रादेशिक कार्यालयाने कमलेश

### दोषींवर कारवाई करण्याची मागणी

घोटाळा बँकिंग क्षेत्रातील सुरक्षिततेच्या उपाययोजनांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करतो. नकली सोन्याच्या तारणावर कर्ज मंजूर होणे हे बँकेच्या अंतर्गत प्रक्रियेत त्रुटी असल्याचे दर्शवते. वैजापूर येथील हा प्रकार स्थानिक नागरिकांमध्येही चर्चेचा विषय ठरला आहे. पोलिसांनी लवकरात लवकर या प्रकरणाचा तपास पूर्ण करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, बँकेत गोल्ड लोनच्या प्रक्रियेसाठी

आनंतराव अधिकार यांना गोल्ड लोनसाठी सोन्याची पडताळणी आणि प्रमाणपत्र देण्याचे काम सोपवले आहे. कमलेश गेल्या पाच वर्षांपासून या शाखेत सोन्याच्या शुद्धतेची तपासणी करत आहेत.

बँकेत गोल्ड लोन देण्याची प्रक्रिया अत्यंत काटेकोरपणे राबवली जाते. ग्राहकाने तारण ठेवलेल्या सोन्याची पडताळणी कमलेश अधिकार यांच्याकडून केली जाते. त्यानंतर उपव्यवस्थापक दिपांजली जेधे यांच्या देखरेखीखाली कर्जाची फाइल तयार होते. शाखा व्यवस्थापक नवनीत शर्मा यांच्या अंतिम स्वाक्षरीनंतर कर्ज मंजूर केले जाते. कर्जाची रक्कम ग्राहकाच्या खात्यात जमा झाल्यानंतर, सोन्याच्या मूल्यांकनासाठी सोनाराला ०.२ टक्के फी दिली जाते. ही सर्व प्रक्रिया पारदर्शकपणे पार पडते, असे बँकेकडून सांगण्यात आले.

# आनंद विद्यालयात रंगली पंढरीची वारी

नगर (प्रतिनिधी)– गुलमोहर रोड आनंद विद्यालय शाळेत आषाढ दिंडी वारी कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला .यावेळी छोटी मुले वारकरी वेशभूषेत आली होती. गुलमोहर रोड वर दिंडीची वारी काढण्यात आली व यामध्ये रिंगण करून नृत्य करण्यात आले.परिसरातील लोकांनी यावेळी थांबून विद्यार्थ्यांचे हे कार्यक्रम पाहिले. आनंद नगर परिसरातील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात विविध कार्यक्रम घेण्यात आले. यावेळी विद्यार्थी, पालक, शिक्षक यांनी फुगडी खेळण्याचा आनंद घेतला.

# वरुणराजाच्या हजेरीत नागवडे स्कूलची बालदिंडी उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा** : पाऊले चालती पंढरीची वाट अश्या उक्तीप्रमाणे हजारो भाविक भक्त पंढरपूरकडे रवाना होत आहेत. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी देखील सांस्कृतिक वारसा जपावा, संस्कारक्षम पिढी घडावी या उद्देशाने सालाबादप्रमाणे याही वर्षी दि. ५ जुलै रोजी नागवडे इंग्लिश मिडीयम स्कूल ची बालदिंडी संपन्न झाली.

यावेळी दिंडी नागवडे मिडीयम स्कूल, बगाडे कॉर्नर मार्गे शनी चौक ते महंमद महाराज मंदिर असा प्रवास यावेळी विद्यार्थ्यांनी केला. महंमद महाराज मंदिर या ठिकाणी विद्यार्थ्यांचे रिंगण पार पडले. यावेळी विद्यार्थ्यांनी विठ्ठल गीतांवरती मनमोहन असे लेझिम लोकनृत्य सादर केले, यावेळी

> हिंदू–मुस्लिम ऐक्यची शिकवण देणारे संत श्री महंमद महाराज प्रांगणात स्व. बापूनी सुरू केलेला बालदिंडी सोहळा हा २५ वर्ष या विद्यार्थ्यांनी सुरू ठेवला ही अभिमानाची बाब आहे.
>
> **– हभप घाडगे महाराज**

भारुडाच्या माध्यमातून देव एकच असून त्याची रूपे मात्र वेगवेगळी आहेत असा संदेश दिला. यावेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्याने उपस्थितांची मने जिंकली.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीगोंदा पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रभाकर निकम, घाडगे महाराज, लाटे महाराज, वाळूज महाराज, जयदत्त साळुंखे, रामदास वाळके



उपस्थित होते. संस्कारक्षम पिढी घडविण्याचे कार्य नागवडे इंग्लिश मिडीयम करत आहे हे कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रभाकर निकम यांनी केले. कार्यक्रम तुळजाभवानी सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे, विश्वस्त अनुराधा नागवडे, निरीक्षक एस. पी. गोलांडे यांच्या मार्गदर्शनाखाली गेली २५ वर्ष अविरतपणे सुरू आहे.

# भरपूर पाऊस पडू दे, बळीराजा सुखी होवू दे : अक्षय कर्डिले

**जनता आवाज वृत्तसेवा**

**करंजी** : आपला देश कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. त्यामुळे राज्यात भरपूर पाऊस पडू दे आणि माझा बळीराजा सुखी होऊ दे, शेतकरी सुजलाम सुफलाम झाला, तर देशातील प्रत्येक नागरिक सुखी आणि समाधानी राहील. त्यामुळे पंढरीच्या पांडुरंगाकडे एकच मागणी आणि प्रार्थना केली आहे की, राज्यात भरपूर पाऊस पडू दे आणि बळीराजा सुखी होऊ दे! अशी विनवणी भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष अक्षय कर्डिले यांनी केली आहे.

राहुरी–नगर–पाथर्डी नेवासासह जिल्हाभरातून श्रीक्षेत्र पंढरपूरकडे मार्गस्थ झालेल्या अनेक दिंड्यांचे स्वागत युवानेते अक्षय कर्डिले यांनी केले. दिंडी चालक दिंडीतील वारकरी यांच्याशी संवाद साधत अनेक दिंड्यातील वारकऱ्यांना मोफत



चहा नाश्ता औषध वाटप कर्डिले यांच्या हस्ते ठिकठिकाणी करण्यात आले. हिंदू विचारसरणीचा कडवट युवा चेहरा म्हणून तरुण वर्ग अक्षय कर्डिले यांच्याकडे आकर्षित होऊ लागला आहे. भगवी पताका खांद्यावर घेत विठू नामाचा जयघोष करत पंढरपूरकडे निघालेल्या अनेक दिंड्यांना कर्डिले यांनी भेटी देऊन ज्ञानोबा तुकारामाचा जयघोष केला. संत कवी महिपती महाराज दिंडी, श्री क्षेत्र बायजामाता दिंडी, श्री त्रिंबकेश्वर खंडाळा पायी दिंडी, शेंगदाणे बाबा मठ पायी दिंडी, तनपुरे बाबा, गव्हाणे बाबा, उंबरेकर महाराज, भगवान बाबा अशा अनेक संत मंतांच्या पायी दिंड्यांचे स्वागत युवा नेते कर्डिले यांनी केले व दिंडीतील वारकऱ्यांचा प्रवास सुखाचा व्हावा व राज्यात भरपूर पाऊस होऊन बळीराजा सुखी व्हावा, अशी प्रार्थना पंढरीच्या पांडुरंगाकडे अक्षय कर्डिले यांनी या निमित्ताने केली.

# सरकारची बदनामी करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करणार

## आ. अमोल खताळ; घरेलू कामगार योजनेअंतर्गत महिलांना साहित्य वाटप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : महायुती सरकारची सर्वसामान्य घरेलू कामगारांसाठीची योजना मोफत आहे. मात्र तालुक्यात काही दलालाकडून लाभर्थीची दिशाभूल सुरू असल्याच्या तक्रारी आपल्यापर्यंत आलेल्या आहेत. कोणत्या ही योजनांसाठी पैसे देवू नका. पैसे घेवून लाभार्थीची आणि महायुती सरकारची बदनामी करणार्या विरोधात फौजदारी गुन्हे दाखल करण्याच्या इशारा आ. अमोल खताळ यांनी दिला.

> डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशन संचलित, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण विभाग अहिल्यानगर व विविध दिव्यांग संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने, एडीप या योजनांतर्गत घुलेवाडी ग्रामीण रुग्णालय येथे १३ जुलैला अस्थिव्यंग प्रवर्गातील दिव्यांग व्यक्तींना मोफत कृत्रिम हात, पाय बसविणे, कॅलिपर्स यांचे मोजमाप व तात्काळ मोफत जागेवर साहित्य वाटप शिबिराचे आयोजन केले आहे. या शिबिराचा दिव्यांग बांधवांनी लाभ घ्यावा.
>
> **– अमोल खताळ, आमदार**

महायुती सरकारने घरेलू कामगार महिलांसाठी सुरू केलेल्या योजनेतील महीला लाभार्थींना साहीत्याचे वाटप आ. खताळ यांच्या उपस्थितीत वितरीत करण्यात आले.

यावेळी शिवसेना तालुका प्रमुख रामभाऊ राहाणे, शहराध्यक्ष दिनेश फटांगरे, विनोद सूर्यवंशी, दिपाली



वाव्हळ, पायल ताजणे, गुलाब भोसले, श्रीकांत गोमासे, गोकुळ दिघे, कैलास कासार, रेखा गलांडे यांच्यासह आदी उपस्थित होते.

आ. खताळ म्हणाले की, महायुती सरकारने सर्वसामान्य माणूस केंद्रीभूत मानून योजनांचे निर्णय केले त्याची अंमलबजावणी राज्यात यशस्वीपणे सुरू आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून योजना सर्व लाभार्थी पर्यत पोहचत असल्याचे त्यांनी सांगितले. घरेलू कामगार योजनेसाठी नाव नोंदणी करताना मोफत नोंदणीसाठी कॅम्पचे आयोजन केले होते. परंतु काही दलालांनी महीलांकडून पैसै घेतल्याच्या तक्रारी आल्या. शासकीय कार्यालयात कोणी पैसे मागत असतील तर आमच्याकडे तक्रारी करा, असेही खताळ यांनी सूचित केले.

# ... अखेर गाव जोडणी रस्ता मोजणी यशस्वी

**जनता आवाज वृत्तसेवा**



**श्रीगोंदा** : तालुक्यातील भिंगाण खालसा येथे दि. २७ जून रोजी वर्षानुवर्षे बंद असलेल्या नकाशावरील रस्त्याची मोजणी कर्तव्यदक्ष प्रभारी तहसीलदार प्रवीण मगदूम व भूमी अभिलेख उपअधीक्षक सुहास जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली वासुदेव पाटील यांच्याकडून पूर्ण करण्यात आली. लवकरच खुणा दाखवून शेतकऱ्यांच्या वाहतुकीसाठी रस्ता खुला होणार असल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यावेळी संतोष शिंदे यांनी ग्रामस्थांच्या वतीने शासनाच्या व शिवपानंद चळवळीच्या या अभियानाला ग्रामस्थांच्या वतीने पूर्ण सहकार्य केले जाईल असे आश्वासन दिले. यावेळी तलाठी निकाळजे, सरपंच पती संतोष शिंदे, ग्रामपंचायत शिपाई, रस्त्यालगतचे शेतकरी व इतर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते व मोजणीस सहकार्य केले. शिवपानंद शेत रस्ते चळवळ महाराष्ट्र राज्याचे राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील व श्रीगोंदा कृती समिती सदस्य ॲड. गोरख कडूस पाटील यांनी मोजणी दरम्यान शेतकऱ्यांचे मार्गदर्शन केले व सर्व ग्रामस्थांचे सहकार्याबद्दल चळवळीच्या वतीने आभार मानले. शेतकऱ्यांचा हक्काचा रस्ता मिळविण्यासाठी शेतकऱ्यांचा संघर्ष व एकजूट हेच या यशामागचे खर श्रेय आहे हिच आमची ताकत आहे, असे दादासाहेब जंगले म्हणाले.

# अमृतवाहिनी तंत्रनिकेतनचा उत्कृष्ट निकाल

## प्रा. धुमाळ यांची माहिती; निकालामध्ये मुलींची बाजी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षण आणि विविध राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय कंपन्यांशी असलेल्या समन्वयामुळे विविध शाखांमधील विद्यार्थ्यांना नोकरीची संधी हे वैशिष्ट्य दाखताना नुकत्याच झालेल्या एमएसबीटीइच्या वार्षिक परीक्षेत गुणवत्ता पूर्ण निकालाची परंपरा जपली असून घवघवीत यश मिळवले असल्याची माहिती प्राचार्य प्रा. व्हि. बी.धुमाळ यांनी दिली आहे.

या निकालाबाबत अधिक माहिती देताना प्राचार्य प्रा. धुमाळ म्हणाले की, माजी शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली व माजी आ. डॉ. सुधीर तांबे आणि संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त शरयूताई देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली अमृतवाहिनी पॉलिटेक्निकने राज्यपातळीवर आपला लौकिक निर्माण केला आहे. यावर्षी महाराष्ट्र राज्य तांत्रिक शिक्षण मंडळ यांच्याकडून झालेल्या परीक्षेमध्ये मेकॅनिकल इंजिनिअरिंग प्रथम वर्षात रुची दुबे येणे ८५.०३ टक्के गुण मिळवून प्रथम, इलेक्ट्रॉनिक ॲन्ड टेली कम्युनिकेशन -धनश्री फुलसुंदर हिने ८५.२९ टक्के गुण मिळून प्रथम, द्वितीय वर्षात सृष्टी कोटकर हिने ८९.४४ टक्के प्रथम, तृतीय वर्षात प्रसाद राहींज याने ९४.६४ प्रथम, मेकॅट्रॉनिक विभागात प्रथम वर्षात आर्या




कडलग हिने ८३.१४ गुण मिळून प्रथम, द्वितीय वर्षात अजिंक्य काळे ८३.५५ प्रथम, तृतीय वर्षात विराज खालकर यांनी ९१.४८ गुण मिळून प्रथम क्रमांक मिळवला.

सिव्हिल इंजिनिअरिंग विभागात प्रथम वर्षात राहुल चौधरी यांनी ८७.४८ गुण मिळून प्रथम, द्वितीय वर्षात कृष्णराज मंडलिक याने ९५.६६ गुण मिळून प्रथम क्रमांक, तृतीय वर्षात रोहन भुसारे यांनी ८९.६८ गुण मिळवून प्रथम, कॉम्प्युटर टेक्नोलॉजी विभागात प्रथम वर्षामध्ये पूजा आंब्रे हिने ८९.९४ गुण मिळवून प्रथम, द्वितीय वर्षात सपना साबळे ने ९४.१८ गुण मिळवून प्रथम, तृतीय वर्षात ओंकार मंडलिक याने ९५.७७ गुण मिळवून प्रथम, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी या विभागामध्ये प्रथम वर्षामध्ये तृप्ती चौधरी येणे ८०.७० गुण मिळवत प्रथम मिळविला.

### यांचे मार्गदर्शन व अभिनंदन

मुलींनी या सर्व निकालांमध्ये बाजी मारली आहे या सर्व विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. व्ही बी धुमाळ, उपप्राचार्य जीबी काळे सर्व विभाग प्रमुख शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मार्गदर्शन केले.या सर्व विद्यार्थ्यांचे माजी शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात,माजी आमदार डॉ सुधीर तांबे, सौ शरयू ताई देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, अकॅडमी डायरेक्टर डॉ. जे बी गुरव यांच्यासह विविध मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

# घुलेवाडी येथे आज युवक काँग्रेसच्या शाखांचे उद्घाटन

**जनता आवाज वृत्तसेवा**



**संगमनेर :** काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा मा.महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसच्या विचारांचा बालेकिल्ला राहिलेल्या संगमनेर तालुक्यात गाव तेथे शाखा अभियान राबवण्यात येणार असून मंगळवार दिनांक ८ जुलै रोजी घुलेवाडी येथील विविध शाखांचे उद्घाटन युवक काँग्रेसच्या अध्यक्ष डॉ. जयश्रीताई थोरात यांच्या उपस्थितीमध्ये होणार आहे.काँग्रेसचा विचार हा शाश्वत असून राज्यघटना व लोकशाही जपणारा आहे. अहिल्यानगर जिल्हा व संगमनेर तालुका हा लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसच्या विचारांचा बालेकिल्ला राहिला आहे. युवक काँग्रेसच्या अध्यक्ष डॉ.जयश्रीताई थोरात यांच्या नेतृत्वाखाली गाव तेथे शाखा हे अभियान राबवण्यात येत असून विविध गावांमध्ये युवक काँग्रेसच्या शाखा सुरू करण्यासाठी सर्व युवक उत्साहित आहेत. या अभियानांतर्गत मंगळवार दिनांक ८ जुलै २०२५ रोजी सायंकाळी ६ वा. पासून रात्री ८ वाजेपर्यंत घुलेवाडी येथील विविध शाखांचा उद्घाटन समारंभ होणार आहे.तसेच या शाखांच्या उद्घाटनाचा एकत्रित व्यासपीठ कार्यक्रम घुलेवाडी गावठाण येथील हिंदुरुदय सम्राट बाळासाहेब ठाकरे व्यासपीठावर होणार असून यावेळी महाराष्ट्र काँग्रेसचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्यासह युवा काँग्रेसचे अध्यक्ष कॅन्सर तज्ञ डॉ जयश्रीताई थोरात, तालुकाध्यक्ष अजय फटांगरे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# कर्जतमध्ये ५५ हजार रूपयांचा गुटखा पकडला

## तीन आरोपींना केले जेरबंद; राशीन-भिगवण रस्त्यावर कारवाई

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत :** विशेष पोलीस पथकाने खाजगी गाडीमधून प्रवास करून सापळा रचत, गुटखा पान मसाला मोठा साठा पकडला.

नगर येथील परिविक्षाविधीन पोलीस उपअधीक्षक संतोष खाडे यांच्या पथकाने खाजगी चार चाकी वाहनाचा वापर करत बंदी असलेला गुटखा, पान मसाला, सुगंधी तंबाखू व चार चाकी वाहन जप्त करून तीन आरोपी जेरबंद केले आहे .या कारवाईमध्ये पाच लाख ५४ हजार ८८५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई कर्जत तालुक्यातील राशीन परिसरामध्ये घडली आहे.

नगर येथील परिविक्षाविधीन पोलीस उपाधीक्षक संतोष खाडे यांना गुप्त माहिती दाराकडून माहिती मिळाली की कर्जत तालुक्यातील राशीन भिगवन जाणाऱ्या रस्त्यावर अवैद्य व बंदी असलेला



गुटखा पान मसाला सुगंधी तंबाखू याची वाहतूक होणार आहे. पोलीस वाहनाचा वापर केल्यानंतर आरोपींना लक्षात येईल. त्यामुळे संतोष खाडे यांनी खाजगी वाहनाचा वापर करून भिगवण होऊन राशीनकडे येणाऱ्या रस्त्यावर राशीन जवळ असणाऱ्या पाण्याच्या टाकीजवळ हे विशेष पोलीस पथक सापळा रचून थांबले होते. इको स्टार कंपनीची चार चाकी गाडी क्रमांक एम एच ४२ बी. २८ ३२ ही येताच पथकाने गाडी पकडली व तपासणी केली असता गाडीमध्ये अवैद्य गुटक्याच् पांढ्या गोण्या व बॉक्स आढळून आले.

ही कारवाई संतोष खाडे, राजेंद्र वाघ, शकील शेख, शंकर चौधरी, दिगंबर कारखेले, दिनेश मोरे, भिंगारदिवे, उमेश खेडकर, सुनील पवार, अजय साठे, अमोल कांबळे, अक्षय भोसले, सुनील दिघे व संभाजी बोराडे या पथकाने केली आहे.

### ही आहेत आरोपींची नावे

गाडीमधील संभाजी शिवाजी सरक, राहणार मदनवाडी भिगवन, अमर अनिल कांबळे राहणार आंबेडकर नगर, राशीन व भाऊसाहेब किसन सकुंडे राहणार मदनवाडी भिगवन या तिघांना अटक करण्यात आली. याशिवाय त्यांच्याकडून एक लाख ५४ हजार रुपये किमतीचा बंदी असलेला सुगंधी तंबाखू गुटखा पान मसाला तसेच चार लाख रुपये किमतीची मारुती सुझुकी कंपनीची चार चाकी गाडी हा मुद्देमाल जप्त केला आहे.

# इंग्लिश मीडियम स्कूलची दिंडी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत :** आषाढी एकादशीच्या पावन पार्श्वभूमीवरसद्गुरु ग्रामविकास प्रतिष्ठान या संस्थेच्या डायनामिक इंग्लिश मीडियम स्कूल या विद्यालयामार्फत एक भव्य दिंडीचे आयोजन करण्यात आले. या दिंडीत शाळेतील विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रुक्मिणी, विविध संत तसेच वारकरी वेशभूषेत सहभाग घेत संपूर्ण कर्जत शहर भक्तिमय केले.

विद्यार्थ्यांनी पारंपरिक व रंगीबेरंगी पोशाख घालून, हातात भगवे पताके घेऊन ''पांडुरंग, पांडुरंग'' तसेच ग्रामदैवत गोदड महाराज असा जयघोष करत फेरी काढली. ढोल-ताशांच्या गजरात आणि ग्रामदैवत गोदड महाराज महाराज यांच्या नामस्मरणाने संपूर्ण वातावरण भक्तिरसात न्हालं. विद्यार्थ्यांनी नाचत-गात उत्साहात भाग




घेत सर्व नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.

दिंडीचा समारोप कर्जत येथील ग्रामदैवत गोधड महाराज मंदिरात झाला. येथे सर्व विद्यार्थ्यांनी दर्शन घेतले. हा उपक्रम संपूर्ण कर्जत शहरात चर्चेचा विषय ठरला असून पालक आणि नागरिकांनी याचे भरभरून कौतुक केले आहे. गोदड महाराज मंदिरामध्ये भाविकांची मांदियाळी धाकटी पंढरी अशी ओळख असणाऱ्या कर्जत येथील ग्रामदैवत गोदड महाराज मंदिरामध्ये आज विविध धार्मिक कार्यक्रमांचा आयोजन करण्यात. पहाटेपासून भाविकांनी दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या.

# मुलिकादेवी विद्यालयात बाल दिंडीचे आयोजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** निघोज येथील श्री मुलिकादेवी माध्यमिक, उच्च माध्य व तंत्र विद्यालयात बालदिंडीचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

या बाल दिंडीमध्ये इयत्ता ५ वी ते इयत्ता ८ वीचे विद्यार्थी सहभागी झाले होते. विद्यालयात श्री विठ्ठल रुख्मिनी पालखी पूजन विद्यालयाचे प्राचार्य अंकुश अवघडे, उपप्राचार्य कैलास मोकळे, पर्यवेक्षक लक्ष्मण झंजाड यांचे हस्ते करण्यात आले. ग्रामपंचायत समोर सरपंच चित्राताई वराळ, उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे, संदिप पाटील वराळ जनसेवा फाउंडेशन चे अध्यक्ष सचिन वराळ , महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य तथा नगर जिल्हा सचिव सुरेश खोसे पाटील, पारनेर तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दत्तात्रय उनवणे, माजी ग्रामपंचायत सदस्य भास्कर वराळ, अल्पसंख्याक समाजाचे नेते अस्लमभाई इनामदार यांचे हस्ते पालखी पूजन करण्यात आले. यावेळी निघोज ग्रामपंचायत, संदीप वराळ पाटील जनसेवा फौंडेशन व पत्रकार संघाच्या वतीने विद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य व पर्यवेक्षक



यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते बजरंग वराळ पाटील, ठेकेदार पोपट लंके, व्यावसायिक आनंदा ढुमणे, सामाजिक कार्यकर्ते पांडुरंग वराळ, सेवानिवृत्त संपतराव रसाळ इतर मान्यवर ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यालयातील विद्यार्थी सर्वज्ञ सुरेश खोसे पाटील याने श्री विठ्ठलाची व श्रेया संतोष लाळगे हिने रुक्मिणीची सुंदर वेशभूषा केली होती. यावेळी ग्रामपंचायतीच्या वतीने विद्यार्थ्यांना केळीचे वाटप करण्यात आले.

# विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले :** अखिल भारतीय स्तरावर शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात सेवाव्रत जपणाऱ्या श्री व श्रीमती रामनारायणजी बुब मेमोरियल ट्रस्ट व अराईज फाउंडेशन पुणे यांच्याकडून टाकळी जिल्हा परिषद शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाची वॉटर प्रुफ स्कुल बॅग, चार वह्या, ड्रॉईंग बुक, वॉटर बॉटल व ज्ञानरचनावादावर आधारित स्वाध्याय पुस्तिकांचे वाटप करण्यात आले.

या साहित्य वाटप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे बाळासाहेब फोडसे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून स्थापत्य अभियंता श्रीकांत नवले उपस्थित होते. याशिवाय पोपटराव शेवाळे, नाना गायकवाड, दत्ताराम दातखिळे, विनायक गाडे, दादा पाटील तिकांडे, जनार्दन गायकवाड, विजय मदगे, श्रीमती रोहिणी पवार, सुनंदा तिकांडे, अलका गांगड, कमल चासकर तसेच मोठ्या संख्येने टाकळी गावातील शिक्षणप्रेमी ग्रामस्थ व प्रतिष्ठित मान्यवर कार्यक्रमास उपस्थित होते.या आनंदमयी कार्यक्रमाला देवठाण बीटाचे शिक्षण विस्तार अधिकारी अनिल गायकवाड यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांना स्कुल किटचे वाटप केले. टाकळी शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविणाऱ्या स्वयंसेवी संस्थांच्या स्तुत्य उपक्रमाचे अकोले तालुका गटशिक्षणाधिकारी अरविंद कुमावत यांनी अभिनंदन व कौतुक केले.

# खुनातील आरोपीची नाशिक कारागृहात रवानगी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** प्राणघातक हत्याराने नागरिकांना मारहाण करुन लोकांमध्ये दहशत निर्माण करणे, खुन करणे तसेच जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे इत्यादी प्रकारच्या गंभीर स्वरुपाच्या विविध गुन्ह्यातील आरोपी सागर मोहळकर यास जामखेड पोलीसांनी पकडून नाशिक मध्यवर्ती कारागृहात रवानगी केली आहे. जामखेड पोलीसांच्या कामगिरीचे कौतुक होत आहे. फिर्यादी सलमान सुलेमान शेख यांनी जामखेड पो.स्टे.ला तक्रार दिली की सेव्हन फिटनेस क्लब (जिम) पंचायत समितीसमोर जामखेड येथे जिम करत असताना तेथे आरोपी सागर दत्तात्रय मोहळकर (रा. जामखेड, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर) हा त्यांचे जवळ गेला व म्हणाला की, तु जिम मध्ये उशीरा का आला असे म्हणून फिर्यादी सुलेमान शेख यांना शिवीगाळ करून गालावर चापट मारली व जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने त्यांना कंबरेला धरून वर उचलुन डोक्यावर व मानेवर फरशीवर जोरात आपटुन जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला होता. सदरचा आरोपी सागर दत्तात्रय मोहोळकर हा त्याचे साथीदारांचे मदतीने लोकांमध्ये दहशत निर्माण करुन वेगवेगळया प्रकारचे गुन्हे करत असतो त्याने यापूर्वी जेलमध्ये अटक असताना एका आरोपीचा खुन केला आहे. त्याचेवर खालील प्रमाणे यापुर्वी सुध्दा गुन्हे दाखल आहेत.

# आहेर यांना आदर्श शिक्षक पुरस्कार




**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** पळसपूर येथील आदर्श विद्यालयात इंग्रजी विषयाचे तज्ज्ञ शिक्षक राजेंद्र मनोहर आहेर यांना नुकताच बी द चेंज फाऊंडेशनने राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार सन्मान पूर्वक प्रदान केला.

ग्रामीण भागात कार्य करणारे आदर्श शिक्षक राजेंद्र आहेर यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान, शालेय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण शैक्षणिक विकासासाठी केलेले अथक परिश्रम सह शालेय कार्यातील आदर्श सेवेसाठी त्यांची निष्ठा, समर्पण भावना व परिश्रम हे विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरले आहे. या कामगिरी ची शिर्डी येथील राज्यस्तरीय कार्य करणाऱ्या 'द बी चेंज' फाऊंडेशनने दखल घेत त्यांना राज्य पातळीवरील आदर्श शिक्षक पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते देऊन सन्मानित केले आहे.

आदर्श शिक्षक राजेंद्र आहेर यांच्या या सन्मानाचे वासुंदे येथील भाऊसाहेब महाराज शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सुजितराव झावरे, सचिव सुदेश झावरे, पळसपूरच्या आदर्श विद्यालयाचे मुख्याध्यापक जाधव, शिक्षक बी. व्ही. आहेर, ए. वाय. आहेर आदींच्यावतीने कौतूक करण्यात येत आहे .

# चित्रकला विषयाचे वाढीव गुण गायब!

## शाळेच्या हलगर्जीमुळे विद्यार्थिनींचे भवितव्य धोक्यात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** कै. सुंदरबाई हिरालाल गांधी कन्या विद्यालय, नेवासा येथील दहावीच्या २२ विद्यार्थिनींच्या भविष्याशी शाळेच्या व्यवस्थापनाने गंभीर खेळ मांडल्याचे उघडकीस आले आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये दहावीची परीक्षा दिलेल्या विद्यार्थिनींच्या गुणपत्रकात चित्रकला विषयाचे वाढीव गुण नोंदवले गेलेच नाहीत.

दि. १३ मे रोजी निकाल जाहीर झाला, मात्र त्यामध्ये या विषयाचे वाढीव गुणच गायब असल्याचे स्पष्ट झाले. विद्यार्थिनींच्या म्हणण्यानुसार, संबंधित चित्रकला शिक्षिकेने हे गुण महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांना सादर केलेलेच नाहीत. यामुळे अनेक विद्यार्थिनींच्या अंतिम टक्केवारीवर प्रतिकूल परिणाम झाला. निकालानंतर सात दिवसांत हरकत घेणे बंधनकारक असतानाही,



शाळेच्या मुख्याध्यापिका, चित्रकला शिक्षिका व वरिष्ठ लिपिक यांनी वेळेत कोणतीही तक्रार किंवा प्रक्रिया मंडळाकडे केलेली नाही. त्यामुळे हा प्रकार अधिक गंभीर मानला जात आहे.विद्यार्थिनींनी व त्यांच्या पालकांनी वारंवार चौकशी केल्यावर शाळेतील कर्मचाऱ्यांनी एकमेकांकडे जबाबदारी ढकलत हा प्रकार दाबून टाकण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात येत आहे. या प्रकारामुळे विद्यार्थिनींच्या शैक्षणिक हक्काचा स्पष्टपणे भंग झाला असून, शाळेच्या कार्यकारी मंडळाने याबाबत खुलासा करून दोषींवर तात्काळ कारवाई करावी, अशी विद्यार्थिनी व पालकांची जोरदार मागणी आहे.शाळेच्या निष्काळजी कारभारामुळे नुकसान झालेल्या विद्यार्थिनींना न्याय मिळावा आणि त्यांच्या गुणांची दुरुस्ती करून त्यांचा निकाल पुनर्परीक्षित करावा, अशी मागणी जिल्हा शिक्षण अधिकाऱ्यांकडेही करण्यात आली आहे.

सदरच्या विद्यार्थिनींच्या पालकांनी शिक्षण विभागाकडे तक्रार करून दाद मागितली आहे यावर शिक्षण विभागाने या संस्थेस नोटीस दिली असून पुढील कारवाईसाठी जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभागाकडे तक्रार अर्ज पाठवलेला आहे.

**-साईलता सामलेटी**
गटशिक्षणाधिकारी, नेवासा पंचायत समिती



# बालांगण

## छोटासा विमानप्रवास

**नवल**

विमान प्रवासाचे नाव ऐकताच आपल्या मनात आकाशात उडणाऱ्या लांब पल्ल्याच्या भल्यामोठ्या विमानांचे चित्र उभे राहते. पण तुम्ही कधी विचार केला आहे का की, जगातील सर्वात लहान उड्डाण किती अंतराचे असू शकते? मुलांनो, जगात उड्डाणानंतर अगदी काही सेकंदाचा प्रवास पूर्ण करुन धावपट्टीवर उतरणारे विमान आहे. हो, आता आपण स्कॉटलंडच्या ऑर्कने बेटांवर असणाऱ्या वेस्ट्रे आणि पापा वेस्ट्रे बेटांदरम्यानच्या उड्डाणाबद्दल बोलत आहोत. हे कोणतेही सामान्य उड्डाण नाही तर गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये जगातील सर्वात लहान अंतराचे व्यावसायिक उड्डाण म्हणून नोंद झालेले विमान उड्डाण आहे. या प्रवासाचे अंतर अवघे २.७ किलोमीटर असून विमानाला ते पूर्ण करण्यासाठी सरासरी ८० सेकंद लागतात. वाऱ्याची दिशा अनुकूल असताना तर हा




वेळ ५३ सेकंदांपर्यंत कमी होतो.

आता तुम्हाला प्रश्न पडला असेल की इतक्या कमी अंतरासाठी विमान का वापरले जाते? या दोन बेटांमध्ये कोणताही रस्ता किंवा पूल नाही आणि समुद्रही असा आहे की बोटीने प्रवास करणे शक्य नाही. म्हणूनच ही हवाई सेवा डॉक्टर, शिक्षक आणि स्थानिक लोकांसाठी एखाद्या जीवनरेषासारखी आहे. या प्रवासासाठी अगदी लहान ब्रिटन-नॉर्मन बीएन२बी २६ आयलंडर विमान वापरले जाते. त्यातून एकावेळी ८-१० प्रवासी प्रवास करु शकतात. हे अनोखे उड्डाण केवळ स्थानिक लोकांसाठीच सोयीची नाही तर जगभरातील पर्यटकांना देखील ते आकर्षित करते.

## अजबगजब आहे इथे

**भन्नाट**

मुलांनो, पृथ्वीवर गुरुत्वाकर्षण आहे. गुरुत्वाकर्षणाचा शोध न्यूटनने लावला. गुरुत्वाकर्षणामुळेच आपण चालू शकतो. सगळ्या वस्तू जिथल्या तिथे रहातात. चेंडू वरून खाली येतो. पण गुरुत्वाकर्षण नसतं तर... कसे राहिलो असतो आपण? वस्तू हवेत तरंगत राहिल्या असत्या. गुरुत्वाकर्षण नसताना काय होतं, याचा अनुभव आपण पृथ्वीवर घेऊ




शकतो. पृथ्वीवरच्या काही ठिकाणी शून्य गुरुत्वाकर्षण आहे. अशा ठिकाणी भन्नाट काहीतरी घडत असतं. अशाच काही ठिकाणी माहिती घेऊ या.

✻ लेहमध्ये मॅग्नेटिक हिल नावाचं ठिकाण आहे. लेह ते कारगिल रस्त्यावरच्या फक्त ३० किलोमीटरच्या या भागात गुरुत्वाकर्षण नाही. या रस्त्यावर चढ आहे. इथे वाहन आपोआप पुढे जातं. इथल्या चुंबकीय लहरींमुळे असं होत असल्याचं म्हटलं जातं. पण हा अनुभव खरंच खूप भन्नाट असतो.

✻ अमेरिकेतल्या रॅपिड सिटीमध्ये कॉसमॉस मिस्ट्री एरिया आहे. इथली काही झाडं विचित्र पद्धतीने झुकल्याचं पहायला मिळतं. इथे चेंडू खाली नाही तर वर जातो. हा प्रकार अनोखाच म्हटला पाहिजे.

✻ अमेरिकेतल्या कॅलिफोर्नियामध्ये मिस्ट्री स्पॉट आहे. हे ठिकाण पर्यटन स्थळ बनून गेलं आहे. या भागात पाणी वरच्या दिशेने वाहताना दिसतं. इथे तुम्ही खाली पडत नाही. वस्तूंचे आकार बदलतात. मिस्ट्री स्पॉटचं रहस्य अजूनही उलगडलेलं नाही.

✻ अमेरिकेतल्या फ्लोरिडामध्येच लेहसारखं एक ठिकाण आहे. स्पूक हिल या नावाने ते ओळखलं जातं.

## मोठा पल्ला गाठला

**प्रेरणादायी**

मुलांनो, ५२ वर्षीय नताली डी हिने १२ दिवसांत १००० किमीची मॅरेथॉन शर्यत पूर्ण करून एक मोठा विक्रम रचला आहे. या काळात तिने थायलंड, मलेशिया आणि सिंगापूर हे देश धावून पार केले. यावेळी तेथे इतके तीव्र उन्ह होते की तिचे बूटही वितळले. पण ती हरली नाही. थकली नाही. त्यामुळेच नताली डो ला थायलंड-सिंगापूर अल्ट्रा मॅरेथॉन सर्वात जलद गतीने पूर्ण केल्याबद्दल सिंगापूरचा पुरस्कार देखील देण्यात आला आहे. आता मलेशियन द्वीपकल्प पायी पार केल्यानंतर ती गिनीज वर्ल्ड रेकॉर्डच्या प्रमाणपत्राची वाट पाहत आहे.

या यशाबद्दल ती म्हणते, मला खेळात आव्हाने स्वीकारायला आवडतात. मला निराशा अजिबात आवडत नाही. या स्वभावामुळेच समस्यांना न घाबरता मी ध्येय पूर्ण करु शकले. नतालीच्या धावण्याने जागतिक धर्मादाय संस्थेसाठी ५० हजार डॉलर्सपेक्षा जास्त निधी उभारला गेला आहे. चॅरिटी स्पोर्ट्सच्या मदतीने ही सगळी रक्कम महिला आणि मुलींना प्रशिक्षण देण्यासाठी वापरली जाईल. एका ध्येयासाठी धावत असताना तिला अनेक अडथळे पार करावे लागले. धावताना बीट वितळलेच त्याचबरोबर तिच्या कंबरेला दुखापतही झाली. मात्र सरतेशेवटी ती जिंकली हे विशेष. अशीच चिकाटी आणि संयम आपणही प्रत्येक कामामध्ये दाखवायला हवा.



## पर्यावरणाचे भान ठेवा

**काळजी घ्या**





मुलांनो, अलिकडेच आपण जागतिक पर्यावरण दिन साजरा केला. खरेतर वर्षातील एकच नव्हे तर प्रत्येक दिवसच पर्यावरण दिन समजला जाणे गरजेचे आहे. जागतिक तापमानवाढ, हवामानातील असामान्य बदल आणि नामशेष होत जाणाऱ्या प्राणी आणि पक्ष्यांची वाढती संख्या बघता याचे महत्त्व वेगळे सांगण्याची गरज नाही. आपण पर्यावरणाचे रक्षण केले नाही तर पृथ्वीवरील जीवन राखणे कठीण होईल.

पर्यावरणाच्या संवर्धनासंबंधी जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि लोकांना निसर्गाचा समतोल राखण्यास प्रेरित करण्यासाठी आता प्रत्येकानेच पुढे यायला हवे. संयुक्त राष्ट्रांनी १९७२ मध्ये हा दिवस साजरा करण्यास सुरुवात केली. दरवर्षी हा विशेष दिवस एका खास थीमसह साजरा केला जातो. या निमित्ताने पर्यावरणीय समस्यांवर प्रकाश टाकला जातो. यंदाच्या पर्यावरण दिनाची थीम 'प्लास्टिक प्रदूषणाचा अंत करा' अशी आहे. ही थीम निवडण्यामागील कारण म्हणजे प्लास्टिक प्रदूषण ही आज जगातील सर्वात मोठ्या पर्यावरणीय समस्यांपैकी एक बनली आहे. प्लास्टिकचा वाढता वापर पर्यावरणाला संकटात टाकत आहे. यामुळे प्राण्यांनाही नानाविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. सूक्ष्म प्लास्टिक मानवी आरोग्यासाठी घातक ठरत आहेत.

दरवर्षी लाखो टन प्लास्टिक वापरले जाते पण त्यातील छोटासा भागच पुनर्वापरासाठी उपयोगात आणला जातो. तसेच प्लास्टिक विघटित होत नसल्यामुळे कशातही मिसळत नाही. स्वाभाविकच प्लास्टिकचे प्रदूषण वेगाने वाढत आहे. समुद्रात मोठ्या प्रमाणात प्लास्टिक टाकले जात असल्यामुळे सागरी जीव गुदमरत आहेत. म्हणूनच प्लास्टिकचे प्रदूषण नियंत्रित करणे खूप महत्त्वाचे आहे. तुम्हीही दररोज हे भान ठेवा आणि हा कचरा टाळण्याचा प्रयत्न करा.

**चित्र रंगवा**



## परीक्षेची तयारी करा

**कार्यानुभव**

इंजिनिअरींगची पदवी मिळवल्यानंतर पुढील शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना गेट परीक्षा द्यावी लागते. गेट म्हणजे ग्रॅज्युएट ॲप्टिट्यूड टेस्ट इन इंजिनिअरींग. इंजिनिअरींगसह तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात उच्च शिक्षण घेण्याची इच्छा असणाऱ्यांना गेट परीक्षा द्यावी लागते. गेट ही आव्हानात्मक आणि कठीण स्पर्धापरीक्षांपैकी एक. गेट परीक्षेतल्या गुणांवर सार्वजनिक क्षेत्रातल्या कंपन्यांमध्ये नोकरी मिळू शकते. म्हणूनच इंजिनिअरींगमध्ये करिअर करण्याची इच्छा असणारे विद्यार्थी पुढे सरकारी कंपन्यांमध्ये नोकरी मिळवू शकतात.

✻ गेट परीक्षेतल्या गुणांच्या आधारे योग्य उमेदवारांची निवड केली जाते. या उमेदवारांची यादी तयार करून त्यांना मुलाखतीला बोलवण्यात येतं. काही वेळा गेट परीक्षेतल्या गुणांवर नोकरी मिळते.




✻ सार्वजनिक क्षेत्रातल्या ६० पेक्षा अधिक कंपन्या गेट परीक्षेतल्या गुणांच्या आधारे कर्मचाऱ्यांची निवड करतात. पण बरेच विद्यार्थी महारत्न कंपन्यांची निवड करत असल्यामुळे या क्षेत्रात खूप स्पर्धा असते.

✻ सेल, भेल, एनटीपीसी, ओएनजीसी, आयओसीएल, सीआयएल, गेल, बीपीसीएल अशा सार्वजनिक क्षेत्रातल्या आघाडीच्या कंपन्यांमध्ये तुम्हाला उत्तम संधी मिळू शकते.

**ठिपके जुळवा**



## निराशा दूर होईल

**ध्यानात घ्या**

मित्रमैत्रिणींनो; शाळेतली किंवा वर्गातली काही मुलं खूप दंगा करतात. वर्गातल्या शांत मुलांना उगाचच त्रास देतात. लहानग्यांची मस्करी करतात. एखाद्याची वही, दप्तर, पेन लपवून ठेवतात. काही मुलं दादागिरी करतात. थोडी धिटुकली मुलं त्यांची शिक्षकांकडे तक्रार करतात. काही मुलं घरी सांगतात. पण घाबरून कोणाला काही न सांगणारीही मुलं असतात. तुम्हाला कोणी त्रास देत असेल तर त्याबद्दल बोलायला हवं. शिक्षकांना, आईबाबांना सांगायला हवं. मुख्य म्हणजे यामुळे निराश होऊ नका. प्रत्येक परिस्थितीला सामोरं जायला हवं.


मुलांनो, स्वत:कडे अजिबात दुर्लक्ष करू नका. दररोज स्वत:साठी काहीतरी करा. आवडत्या गोष्टींसाठी वेळ द्या. गाणी ऐका, पुस्तकं वाचा. यामुळे तुम्हाला थोडं बरं वाटेल. ताण कमी होईल. उगाचच घरात बसून राहू नका. मैदानी खेळ खेळा. व्यायाम करा. शारीरिक हालचालीमुळे अँडॉर्फिन नावाच्या हार्मोनची निर्मिती होते. या हार्मोनमुळे आनंदी आणि उत्साही वाटू लागतं.



इतर मुलं आपल्याला का त्रास देतात, आपल्यात काही कमी आहे का, असे विचार मनात येतात. कधीकधी खूप निराश वाटतं. अशा वेळी अंगचे चांगले गुण, कौशल्यांचा विचार करा.

## फोटो येतील सुरेख

**कार्यानुभव**



छोट्यांनो, कुठेही फिरायला गेल्यावर तुम्ही भरपूर फोटो काढता. घरातल्या लग्नकार्यातही बरेच फोटो काढले जातात. व्हिडिओ शूट केले जातात. पण आपले फोटो आणि व्हिडिओ चांगले यायला हवेत, यासाठी काही टिप्स फॉलो करता येतील.

✻ फोटो काढताना किंवा व्हिडिओ रेकॉर्ड करताना मागच्या कॅमेऱ्याचा वापर करा. सेल्फी कॅमेऱ्याच्या तुलनेत फोनच्या मागच्या कॅमेऱ्याचं रेझोल्यूशन जास्त असतं. स्वत:चे व्हिडिओ रेकॉर्ड करण्यासाठी फ्रंट कॅमेऱ्याचा वापर होतो. पण त्याऐवजी मागचा कॅमेरा वापरा. फ्रंट कॅमेऱ्याने व्हिडिओ रेकॉर्ड करायचा असेल तर लँडस्केप मोडचा वापर करता येईल.

✻ दर्जेदार व्हिडिओ बनवण्यासाठी तो लँडस्केप मोडमध्ये रेकॉर्ड करा. पोर्टेट किंवा इतर मोडमध्ये रेकॉर्ड केलेला व्हिडिओ स्मार्टफोनमध्ये चांगला दिसतो. पण हा व्हिडिओ टीव्ही किंवा कॉम्प्युटरवर बघताना चांगला वाटणार नाही. त्यामुळे व्हिडिओ नेहमी लँडस्केप मोडमध्ये रेकॉर्ड करा.

✻ कॅमेरा हातात धरून रेकॉर्ड करण्यापेक्षा वेगळे अँगल टिपा. काही इफेक्ट्स वापरा. एकाच ठिकाणाहून रेकॉर्ड करू नका. कॅमेरा पुढे मागे करा. क्लोज अप शॉट घ्या. यामुळे तुमच्या व्हिडिओचं खूप कौतुक होईल.

## इडली आली कुठून?

**खाद्यजत्रा**

छोट्या दोस्तांनो, तुमच्यापैकी अनेकांना इडली खूप आवडते ना? ही दक्षिण भारताची देणगी असल्याचे अनेकांना वाटते. मात्र इडलीची उत्पत्ती इंडोनेशियामध्ये झाली आहे बरं का. आश्चर्य वाटले ना? पण हेच सत्य आहे. इसवी सन ८०० ते १२०० दरम्यान इंडोनेशियामध्ये 'केडली' नावाचा एक पदार्थ खूप लोकप्रिय होता जो आजच्या आपल्या इडलीसारखाच होता. त्याकाळी इंडोनेशियामध्ये तांदूळ आणि किण्वन प्रक्रिया करुन रोजच्या जेवणात या घटकांचा मोठ्या प्रमाणात वापर होत असे. म्हणजेच पदार्थ आंबवून वापरण्याची पद्धत



तेव्हा रुढ होती. आजची इडली त्याच पद्धतीने तयार होते.

काही सिद्धांत असेही म्हणतात की, इडली अरब देशांमधून आली आहे. अरब व्यापारी भारतात किण्वन तंत्रज्ञान घेऊन आले. त्यांनी तांदूळ आणि डाळ मिसळून किण्वन प्रक्रिया शिकली आणि इडलीसारखे काहीतरी बनवले, जे भारतात आल्यानंतर पुढे विकसित झाले.

मग ती भारतात कशी पोहोचली आणि दक्षिण भारतात इतकी लोकप्रिय कशी झाली, याचे उत्तर शोधावे लागेल. मुलांनो, इंडोनेशिया मधून भारतात आलेले लोक पदार्थ बनवण्याची ही कृती बरोबर घेऊन आले होते. भारतात आल्यानंतर त्यात काही बदल करण्यात आले आणि नंतर काही स्थानिक मसाले वापरुन तसेच वेगळ्या पद्धतींने इडली बनवली जाऊ लागली.

तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की इडलीचा पहिला उल्लेख कन्नड साहित्यात ९२० मध्ये आढळतो. त्यात या पदार्थाला 'इड्डालिगे' असे म्हटले गेले आहे.

### स्मार्ट टिप्स


#### हुशारीने करा अभ्यास

मुलांनो, अभ्यास नेहमीच खूप हुशारीने करायला हवा. फक्त घोकंपट्टी किंवा पाठांतर करून काहीच होणार नाही. अभ्यासातही स्मार्टनेस यायला हवा. यासाठी वर्गात नीट लक्ष द्या. शिक्षक शिकवत असतानाच महत्त्वाचे मुद्दे नोंदवून ठेवा. पुस्तक वाचत असतानाही तुम्ही काही मुद्दे टिपून ठेऊ शकता. यामुळे परीक्षेचा अभ्यास करताना तुम्हाला अडचणी येणार नाहीत.



### खादाडी


#### गार्लिक ब्रेड स्टीक्स



दोस्तांनो, तुम्ही वेगवेगळे पदार्थ बनवू शकता. असाच एक पदार्थ म्हणजे गार्लिक ब्रेड स्टीक्स. यासाठी सात ते आठ लसूण पाकळ्या सोलून घ्या. थोडी कोथिंबिर, १०० ग्रॅम बटर, एक चमचाभर चिली फ्लॅक्स,आठ ब्रेड स्लाईस, १०० ग्रॅम मॉझरेला चीझ, अर्धा कप उकडलेले स्वीट कॉर्न, दोन हिरव्या मिरच्या हे साहित्य घ्या. लसूण ठेचून किंवा मिक्सरमध्ये वाटून घ्या. त्यात चिरलेली कोथिंबिर, थोडं बटर, चिली फ्लॅक्स घालून नीट मिक्स करा. आता चार ब्रेड स्लाईस घ्या. या स्लाईसच्या एका बाजूला गार्लिक बटर लावून घ्या. त्यावर किसलेलं मॉझरेला चीझ घाला. थोडे मक्याचे दाणे आणि मिरच्यांचे तुकडे घाला. त्यावर दुसरा ब्रेड स्लाईस ठेवा. ब्रेडच्या वरच्या बाजूलाही गार्लिक बटर लावा. आता गॅसवर तवा ठेवा. त्यावर हे सँडविच ठेवा. दुसऱ्या बाजूलाही बटर लावून घ्या.

### दोस्त हे मस्त

#### उंटांची न्यारी दुनिया




दोस्तांनो, उंट वाळवंटात रहातात. वाळवंटात खूप कमी पाणी असतं. म्हणूनच पाणी सापडल्यावर एक उंट एकाच वेळी ४० गॅलन पाणी पिऊ शकतो. उंट एका तासात ४० मैल अंतर कापू शकतात. उन्हात गेल्यावर आपल्याला घाम येतो. पण सतत कडक उन्हात रहाणाऱ्या उंटांना घाम येत नाही. त्यामुळे त्यांना सारखी तहान लागत नाही. उंटांच्या शरीराचं तापमान १०६ फॅरनहिटवर गेल्यानंतर त्यांना घाम यायला सुरूवात होते.

### योगा टाईम

#### अर्ध चंद्रासन ठेवेल तंदुरुस्त!

योगासनांचे बरेच प्रकार आहेत. प्रत्येक योगासनामुळे वेगळे लाभ होतात. काही योगासनांमध्ये उंची वाढायला मदत होते तर काही योगासनं केल्याने रोगप्रतिकारशक्ती वाढते. तुम्हाला तंदुरुस्त रहायचं असेल तर अर्ध चंद्रासन करता येईल. अर्ध चंद्रासन थोडं कठीण आहे. पण सरावाने ते सहज जमेल. मग अर्ध चंद्रासन नक्की शिकून घ्या.



हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, ✻ कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11. This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11